दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम
रविवार पुरवणी १९ मे २०२४

## डॉ. दाभोलकरांच्या हत्येचे भांडवल ?



जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई
संपर्क क्रमांक :
९६६४५५९७८०

बहुचर्चित डॉ. दाभोलकर हत्याकांडाचा निकाल अखेर लागला. यामध्ये २ आरोपींना जन्मठेपेसह ५ लाख रुपये दंडाची शिक्षा झाली तर तिघांना पुराव्याअभावी निर्दोष सोडण्यात आले. या निकालाबाबत दोन्ही पक्षांनी समाधान व्यक्त केले असले, तरी दोन्ही पक्ष पुढील न्यायालयात दाद मागण्यासाठी जाणार आहेत. या सर्वांत अधिक चर्चा झाली ती तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या वादग्रस्त विधानाची. पुण्यातून दाभोलकरांच्या हत्येची बातमी कानी येताच काही मिनिटांच्या आत तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी कोल्हापुरात समस्त माध्यमांसमोर या खुनामागे गोडसेवादी विचारसरणीचा हात असल्याचे विधान करून तपास कोणत्या दिशेने करायला हवा याचा मार्गच तपासयंत्रणांना जणू दाखवून दिला. मुख्यमंत्र्यांच्या विधानानंतर दाभोलकर परिवारानेही यावर री ओढली. परिणामी या तपासात पुढे हिंदुत्ववादी संघटनांना गोवण्याचा प्रयत्न झाला, संघटनांच्या कार्यकर्त्यांच्या चौकशा करण्यात आल्या. त्यांच्या कार्यालयांवर धाडी टाकण्यात आल्या. ज्यामध्ये सनातन संस्थेचे नाव सर्वात पुढे आले. डॉ. दाभोलकर आणि सनातन यांचे वैचारिक मतभेद होते यातूनच ही हत्या झाल्याचे कारण तपासयंत्रणांनी समोर केले आणि त्या दिशेने तपास झाल्याचे मत सनातन संस्थेने पत्रकार परिषद घेऊन व्यक्त केले आहे. दाभोलकरांच्या हत्या प्रकरणात तपास एकांगी झाल्यानेच आज सत्य समोर येऊन सनातनच्या एका साधकांसह अन्य दोन हिंदुत्ववाद्यांची मुक्तता झाली आणि खरे मारेकरी तपास यंत्रणांपासून दूरच राहिले. दाभोलकरांच्या रूपाने एक विज्ञानवादी विचारवंत समाजाने गमावला आहे, दाभोलकर परिवारावर त्यावेळी दुःखाचा डोंगर कोसळला होता त्यामुळे आज ११ वर्षांनंतर आलेल्या निकालानंतरही सामाजिक भावना दाभोलकर परिवाराच्या बाजूने आहेत; मात्र एव्हढ्या प्रतिष्ठित व्यक्तिमत्वाच्या हत्येचा तपास चुकीच्या दिशेने केल्याचे दुःखसुद्धा समाजाला आहेच. या निकालानंतर माजी मुख्यमंत्र्यांना त्यांनी केलेल्या वक्तव्याबाबत माध्यमांनी विचारणा केली असता त्यांनी आजही आपल्या वक्तव्यावर ठाम असल्याचे सांगितले याचे खरेतर आश्चर्य वाटते. त्यांच्या विधानामुळे एका महत्वाच्या गुन्ह्यातील तपासाची दिशा भरकटली. तीन आरोपी निर्दोष सुटले या बाबींकडे दुर्लक्ष करून कसे चालेल.

डॉ. दाभोलकर हत्येचा निकाल आल्यानंतर सनातन संस्थेने पत्रकार परिषद घेऊन आलेल्या निकालाचे स्वागत केले आणि काही प्रश्न उपस्थित करताना फिर्यादी पक्षांवर आरोपही केले, ज्याची उत्तरे समाजाला मिळायला हवीत अशीही त्यांनी मागणी केली. दाभोलकरांची हत्या झाली त्याच दिवशी मुंब्र्यातून खंडेलवाल आणि नागोरी या दोघांना एका खंडणीच्या प्रकरणात अटक करण्यात आली. त्यांच्याकडे जे पिस्तूल सापडले त्याच पिस्तुलातून डॉ. दाभोलकर यांच्यावर गोळ्या झाडल्याचे बॅलेस्टिक अहवालातून स्पष्ट झाले असताना तपास त्या दिशेने का झाला नाही ? या प्रकरणात डॉ. वीरेंद्रसिंह तावडे यांना अटक झाल्यानंतर डॉ. तावडे हेच या हत्याप्रकरणात मास्टर माईंड असल्याचा प्रचार दाभोलकर परिवारासह अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केला. त्यांनी सनातन संस्थेचे साधक अकोलकर आणि पवार यांची छायाचित्रे असलेले पोस्टर्स ठिकठिकाणी लावले ज्यावर डॉ. तावडे यांच्या सांगण्यानुसार सनातन संस्थेचे अकोलकर आणि पवार यांनी डॉ. दाभोलकरांची हत्या केली असा मजकूर लिहिण्यात आला होता. आज डॉ. तावडे यांची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे आणि सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे मग सनातन विरोधी पोस्टरबाजी करून दाभोलकर परिवार आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीने जाणीवपूर्वक सनातन संस्थेची बदनामी का केली ? डॉ. तावडे यांना अटक झाल्यावर तेच या हत्येचे मास्टर माईंड असल्याचा प्रचार करणारा दाभोलकर परिवार गेल्या काही वर्षांपासून हत्येमागील मास्टर माईंड अद्याप बाहेर असल्याचा प्रचार करत आहे. सीबीआयने आपला तपास पूर्ण करून चार्जशीट फाईल केल्यानंतरही हत्येमागील मास्टर माईंड पकडला गेला नसल्याचे एकच कारण सांगत मागील आठ वर्षांपासून या हत्याप्रकरणाचा निकाल थांबवून ठेवल्याचा आरोपही या प्रकरणातील आरोपीच्या वकिलांकडून केला गेला. या हत्येचा तपास जलदगतीने करण्याची मागणी आरोपींकडून केली जात होती आणि दाभोलकर परिवार यामध्ये वेळकाढूपणा करत असल्याचेही वकिलांनी यावेळी सांगितले. याशिवाय न्यायालयात सादर करण्यात आलेल्या एका साक्षीदाराची दाभोलकर परिवाराने घरी जाऊन भेट घेतली, सुनावणीच्या वेळी साक्षीदार अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यान्सोबत जेवायला बसत, असे गंभीर आरोपही या पत्रकार परिषदेतून करण्यात आले. डॉ. तावडे यांच्या विरोधात साक्ष देण्यासाठी ज्या साक्षीदाराला उभे करण्यात आले होते त्या साक्षीदारावर कोल्हापुरातील महालक्ष्मी मंदिरातील ६०० किलो चांदीचा अपहार केल्याचा आरोप आहे. हे प्रकरण डॉ. तावडे यांनीच हिंदू जनजागृती समितीच्या अंतर्गत कार्य करताना उजेडात आणले होते. हे पुढे न्यायालयातही सिद्ध झाले. सनातन संस्थेच्या विक्रम भावे यांना डॉ. दाभोलकरांच्या हत्येआधी घटनास्थळाची रेकी केल्याचा आरोपाखाली अटक करण्यात आली होती; मात्र हा आरोपही न्यायालयात सिद्ध होऊ शकला नाही. याच प्रकरणात वापरण्यात आलेले शस्त्र नष्ट करण्याचा सल्ला दिल्याचा आरोप करण्यात आलेले अधिवक्ता संजीव पुनाळेकर हे हिंदुत्ववाद्यांचे खटले लढतात म्हणूनच त्यांना गोवण्यात आल्याचा आरोप सनातनने यावेळी केला. पुनाळेकर यांच्यावर लावलेले आरोपही न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत . विक्रम भावे पुनाळेकर यांना त्यांच्या कामात साहाय्य करत असल्याने त्यांनी पुनाळेकर यांच्या विरोधात खोटी साक्ष द्यावी यासाठी तपास अधिकाऱ्यांनी भावे यांच्यावर दबाव टाकण्यात आल्याचेही भावे याने आज स्पष्ट केले आहे.

एका सामाजिक विचारवंताचा दिवसा ढवळ्या खून होतो ही सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर बाब आहे; मात्र त्या घटनेचे भांडवल करून प्रत्यक्ष मुख्यमंत्र्यांकडून राजकीय स्वार्थासाठी तपासाची दिशा भरकटवली जाणे, हिंदुत्ववादी संघटनानांना टार्गेट करणे, त्यांची बदनामी करणे, चौकशीच्या नावाने संघटनांच्या कार्यकर्त्यांचा छळ करणे, त्यांच्यावर दहशतवादाचे आरोप करणे, 'भगवा दहशतवादा'ची दवंडी पीटणे, फिर्यादींकडून तपास यंत्रणांची दिशाभूल केली जाणे, तपासात वेळकाढूपणा करणे, खोटे साक्षीदार उभे करणे या सर्व बाबी अत्यंत गंभीर आहेत. एखादी संघटना नावारूपाला येण्यासाठी त्या संघटनेतील सक्रिय कार्यकर्त्यांना भरपूर परिश्रम घ्यावे लागतात; मात्र अशा काही प्रकरणामध्ये जेव्हा त्या संघटनेचे नाव घेतले जाते तेव्हा हे सारे परिश्रम मातीमोल ठरतात. कालांतराने तिचे निर्दोषत्व जरी सिद्ध झाले तरी झालेली बदनामी ही कधीच भरून काढता येत नाही. डॉ. दाभोलकर हत्याप्रकरणातही हेच झाले आहे. सनातन संस्थेचे निर्दोषत्व आज जरी सिद्ध झाले असले तरी या संपूर्ण प्रकरणात संस्थेची झालेली बदनामी कशी आणि कोण भरून काढणार ? असा सवाल यानिमित्ताने सनातन संस्थेने उपस्थित केला आहे. या सर्वामागे शहरी नक्षलवादाचा हात असण्याची शक्यताही यावेळी सनातन संस्थेच्या प्रवक्त्यांनी बोलून दाखवली असून येणाऱ्या काळात शहरी नक्षलवादाची पाळेमुळे खणून काढण्याचे मोठे आव्हान तपास यंत्रणांसमोर असणार आहे.

### दैनिक सिंधुदुर्ग समाचार

दैनिक सिंधुदुर्ग समाचारने कोकणातील मुलांना या उन्हाळी सुट्टीमध्ये लिहीत होण्यासाठी एक नवीन उपक्रम हाती घेतला आहे. यामध्ये कोकणातील विविध शाळांतील मुलांनी केलेले लिखाण प्रसिद्ध होणार आहे.

प्रामुख्याने या "बालमैफिल" च्या पुरवणीची सर्व जबाबदारी दापोली तालुक्यातील चंद्रनगर येथील शाळेच्या विद्यार्थ्यांनी घेतली आहे. यामध्ये मुलांना लिखाण करण्यासाठी मुलांना प्रोत्साहित करण्यापासून ते पुरवणीची सर्व जबाबदारी या शालेय विद्यार्थ्यांनी घेतली आहे.

## मनाच्या हिंदोळ्यावर



बाबू घाडीगांवकर,
त्रिंबक, ता.मालवण.
मो. ९४२१७९५९५५.

# वाडीची पूजा







दरवर्षी मे महिन्यात आमच्या वाडीची पूजा साजरी होते. तसे पाहिले तर श्री सत्यनारायण महापूजा हे केवळ निमित्त असते. मात्र या निमित्ताने वाडीतील सर्वांचे छान 'गेट टुगेदर' होते. दिवसभर भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन, सहभोजन, महाआरती, गमतीशीर खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, भजन, फुगडी, वारकरी दिंडी, वाडीतील, गावातील थोरामोठ्यांचे सन्मान, सत्कार आणि रात्रौ नामांकित दशावतार नाटक कंपनीचा महान पौराणिक नाट्यप्रयोग असा हा भरगच्च कार्यक्रम असतो.

याआधी अनेक लेखांत उल्लेख केला आहेच की, मे महिन्यात कोकणातील सारी घरे मुलामाणसांनी भरून जातात. सारे मुंबईकर सगेसोयरे आपापल्या 'मटी'च्या ओढीने गावाकडे येतात. आमचाही गाव यास अपवाद नाही. आमच्या वाडीतील सारे मुंबईकर या महिन्यात गावी येतात आणि सारे मिळून पुजेच्या कार्यक्रमाचे नियोजन करतात. तसे पाहिले तर सार्वजनिक पुजेचे नियोजन करणे ही साधी सोपी गोष्ट नाही. त्यासाठी विविधांगी विचार व तसेच नियोजन करावे लागते. मनुष्यबळ ते सर्व यांत्रिक, तांत्रिक गोष्टी विचारात घ्याव्या लागतात.

गावच्या पुजेविषयीची एक अनामिक ओढ वाडीतील प्रत्येकाला पुजेसाठी ओढून आणते. वाडीतील प्रसिद्ध शिवकालीन तलावाच्या काठावर स्वयंभु महापुरुषाचे देवस्थान आहे. या श्री देव महापुरुषाचे महात्म्य अगाध आहे. या महापुरुषाच्या अनेक आख्यायिकाही प्रसिद्ध आहेत. याच महापुरुषाच्या देवस्थानात वार्षिक सार्वजनिक पुजेचे आयोजन होते. या पुजेसाठी फार मोठा मंडप घालतात. मात्र या मंडपासाठी कोणतेही महागडे सामान आणत नाहीत. वाडीतील प्रत्येकजण आपापल्या घरातून मंडपासाठी आवश्यक मेडी, काठ्या, पडदे, तोरणे वगैरे घेऊन येतात. वाडीतील तरुण मंडळी श्रमदानातून हा मंडप उभा करतात. महापुरुषाच्या देवस्थानातील आवाराचे सडासारवण होते, सुंदर रांगोळी काढतात. वाडीतील बाया माणसे सामुहिक श्रमदानातून सडासारवण, जेवणाची तयारी करतात. तळ्यावरच्या झऱ्यातून पिण्याचे, जेवणासाठीचे पाणी आणण्याचे कामही याच बाया करतात. वाडीची पूजा हा एक असा नयनरम्य सोहळा असतो की, येथील लोकांच्या मेहनतीने या सोहळ्याचे सौंदर्य अधिक वाढते.

दरवर्षी वाडीतील एका ज्येष्ठ जोडप्यास या पुजेचे यजमानपद भुषविणयाचे भाग्य लाभते. हाच जोडा पुजेसही बसतो. मात्र वाडीतील प्रत्येकजण आपल्याच घरचा समारंभ समजून या पुजेच्या कार्यक्रमात आपापले योगदान देतो. महापुरुषाचे हे देवस्थान अतिशय नयनरम्य व नितांतसुंदर परिसरात आहे. एका बाजूला शिवकालीन सुंदर तलाव, दुसऱ्या बाजूला नारळी पोफळींची आंब्या फणसांची गर्दी आणि दोन बाजूंना कोळमाच्या रानाची गर्द व दाट वनराई असा हा सुंदर परिसर आहे. कोळमाच्या रानातून अविरत वाहत येणारा झुळुझुळु वारा येथील आसमंत अधिक बेधुंद करतो. या देवस्थानात कधीही उकाड्याचा वा गर्मीचा त्रास जाणवत नाही. पोटभर जेवलेला कोणीही किंवा अर्धपोटी राहिलेला कोणीही या महापुरुषाच्या पारावर अंग टाकून पडला तर क्षणार्धात तो डारडूर झोपी जाईल इतके इथले वातानुकुलन वा वायुवीजन आहे.जवळच्या बांबरातील झऱ्याचे पाणी पाटाने थेट महापुरुषाच्या चरणांजवळून वाहते इतकी सुंदर इथली नैसर्गिक व्यवस्था आहे.

गावातील सर्वजण फार मोठ्या श्रद्धेने महापुरुषाकडच्या पुजेस हजेरी लावतात. तसेच अनेकजण या सार्वजनिक पुजेचा कार्यक्रम आयोजित करणाऱ्या मंडळास यथाशक्ति आर्थिक हातभारही लावतात. या गावातील प्रासादिक भजन मंडळे, वारकरी दिंडी मंडळे त्यांच्या कला सादरीकरणासाठी प्रसिद्ध आहेत. ही सारी मंडळे महापुरुषाच्या भक्तिमय वातावरणात आपापली कला सादर करतात. दिवसभर आणि रात्रीदेखील येथे सहभोजन पार पडते. दिवसभरात शेकडो किंबहुना जवळपास हजारभर लोक येथे सहभोजनाचा आस्वाद घेऊन तृप्त मनाने घरी जातात. गावातील फुगडी मंडळ त्यांची पारंपारिक कला सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवते. याशिवाय विविध मनोरंजक खेळांच्या स्पर्धा या दिवशी आयोजित करतात.

अशा खेळांच्या निमित्ताने वाडीतील अनेकजण आपले वय म्हातारपण विसरून सर्व खेळांमध्ये सहभागी होतात. अर्थातच तरुण पिढीही अशा स्पर्धेत कधी मागे नसते. येथील गावकरी निस्सीम कलासक्त आहेत. दशावतारी नाटकांनाही येथे भक्कम लोकाश्रय आहे. एवढेच कशाला, जवळपासच्या तीन चार गावांतून अनेक नाट्यरसिक येथील दशावतारी पौराणिक नाट्यप्रयोग पाहण्यासाठी आवर्जून येतात. दरवर्षी नवीन नाटक कंपनीस येथे आमंत्रित करण्याचा प्रघात येथील आयोजक मंडळाने जपला आहे. जेणेकरून दरवर्षी नवनवीन कलाकारांची अदाकारी व अभिनय पाहण्याची संधी येथील सर्व नाट्य रसिकांना लाभेल. खरेतर इतर! आवश्यक धार्मिक व संगीत कार्यक्रम उरकेपर्यंत दशावतार नाटक सुरु होण्यास रात्री उशीर होतोच. मग सुरु झालेले हे नाटक अगदी पहाटेपर्यंत चालते. मात्र कोणीही प्रेक्षक नाटक संपेपर्यंत इथून जागचा हलत नाही ही येथील रंगभुमीची दैवी देणगी आहे. नाटक कंपनी रंगतो व कोणतीही असो, येथील रंगभूमीवर सादर झालेला प्रत्येक नाट्यप्रयोग कमालीचा सर्व प्रेक्षकांना जागीच खिळवून ठेवतो.

जेवढ्या उत्साहाने सार्वजनिक पुजेचा कार्यक्रम साजरा होतो, तेवढ्याच उत्साहात दुसऱ्या दिवशी येथील सारा माहौल मोकळा करतात. मंडप काढणे, पडद्यांच्या घड्या करणे, तोरणे, झाझमे काढणे, मंडपासाठी, इतर सजावटीसाठी लागलेले सारे साहित्य ज्याचे त्याला परत करणे, मंडळाच्या सार्वजनिक सामानाची योग्य जागी व्यवस्था करणे यांसारखी कामे पुर्वीच्याच उत्साहात पार पडतात. एकंदरीत वाडीच्या पुजेचे हे कवित्व पुढचे काही दिवस चालतेच. सार्वजनिक पुजेतून मिळालेल्या आनंदाचे, समाधानाचे आणि उर्जेचे गाठोडे सोबत घेऊनच येथील प्रत्येक मुंबईकर पुढे मुंबई गाठतो आणि इथे राहणारा आपल्या शेतीत रमतो. वाडीची पूजा ही केवळ पूजा नसतेच. तर ते लोकांना एकत्र आणण्यासाठीचे, विरंगुळ्याचे व एकजुटीचे माध्यम असते असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.



## साप्ताहिक सदर
# तिचा गौरव



चित्रा अविनाश नानिवडेकर,
सफाळे- पालघर.
मो. 9969669523

**लेखिकेचा परिचय :**
**चित्रा नानिवडेकर या प्रथितयश लेखिका व संवेदनशील कवयित्री आहेत. समाजात वावरताना आपल्या अवती भवती दिसणाऱ्या, दैनंदिन जीवनात जगताना पावलोपावली संघर्ष करणाऱ्या स्त्रियांच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न चित्रा नानिवडेकर आपल्या साप्ताहिक सदरातून करणार आहेत.**

## मातृत्वाचे दर्शन...!!

ह्यावर्षी परिचारिका दिन आणि मातृदिन एकाच दिवशी म्हणजे 12 मे ला आला.आईच्या खालोखाल आपल्याला सांभाळून घेते ती बहिण. जिच्या पोटात सुद्धा आई सारखी माया, काळजी असते.

कोरीना काळात तर परिचारिकांच्या सेवाभावी वृत्तीचे दर्शन सबंध जगाला झाले. जेंव्हा आपण बंद खोलीत क्वारंटाईन होऊन आपल्या प्रियजनांच्या चिंतेत होतो. तेंव्हा स्वतःच्या घरच्याची पोटच्या मुलांची चिंता बाजूला ठेवून ती अहोरात्र जड पी.पी.ई.किट परिधान करून स्वतःच्या शरीरधर्माची पर्वा सुद्धा न करता आपली ड्युटी सांभाळीत होती.त्या काळात रुग्णांच्या जवळ अगदी घरातले, जवळचे सुद्धा फिरकत नसत अशा परिस्थितीत वॉर्डात चार आपुलकीचे शब्द तिच्या तोंडून ऐकणं किती दिलासादायक वाटलं असणार हे त्या त्या अनुभवातून जाणाऱ्या प्रत्येकाला आठवत असणार.

ज्या कर्तव्यदक्षतेने कोरोनाकाळात परिचारिकांनी जगाला आपली जिद्द आणि आपला बाणा दाखवला. तशाच एका कणखर आणि जिद्दी सिस्टरची आज आठवण काढल्या शिवाय परिचारिका दिवस आणि मातृदिवस साजरा होणं शक्य नाही.

ती कर्तव्य शलाका म्हणजे “अंजली कुलथे” 26.नोव्हेंबर 2008ची ती काळरात्र. अजमल कसाब ह्या नराधम अतिरेक्यानं आपल्या एका साथीदारासोबत मुंबईच्या प्रसिद्ध कामा हॉस्पिटल मध्ये बेधुंद गोळीबार केला.मॅटरनीटी वॉर्ड च्या खिडकीतून सिस्टर अंजली ह्यांना हा प्रकार दिसला मात्र...परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी वॉर्डातले आधी लाईट बंद केले.20 गर्भवती पेशंट असल्याची नुकतीच ओव्हर त्यांनी आधीच्या ड्युटीवरील स्टाफ कडून घेतली होती. पटापट मनाशी निर्णय घेत त्या एकेका रुग्णापाशी जाऊन त्यांना धीर देत हळूच वॉर्ड च्या दुसऱ्या टोकाला असलेल्या पॅन्ट्री (दूध वगैरे तापवण्या साठी असणारी जागा )तिथे नेऊन बसवत होत्या. कोणाला हळूच ब्लँकेटवर झोपव, कोणाला खुर्चीवर बसवून...पुढच्या रुग्णाला आणत होत्या. तशात दोघी जणी प्रसवमुख होत्या. नॉर्मल डिलिव्हरी त्यांना सहज करता येत होती. पण घाबरलेली रुग्ण जर कंप्लिकेटेड झाली तर?

हळूच त्यांनी ऑनड्युटी डॉक्टर्स ना कळवायचा प्रयत्न केला. परंतु त्या नराधमाने फोन च्या लाईन्स कापल्या म्हणून संपर्क होत नव्हता. इतर रुग्णांच्या साहाय्याने त्यांनी लेबर टेबल वर घेऊन एक डिलिव्हरी पार पाडली.
खरंच संपूर्ण रात्र डोळ्यात तेल घालून जगवणाऱ्या सिस्टर अंजली आपल्याला मनापासून सलाम. नुकत्याच झालेल्या परिचारिका दिनाच्या निमित्ताने लोकमत च्या माध्यमातून त्यांना प्रश्न विचारला गेला.

‘अंजली सिस्टर...एवढं मोठ्ठ धाडस करायला तुम्हाला बळ कुठून आलं? भीती वाटली नाही का’?

त्या म्हणाल्या “नर्सिंग चा युनिफॉर्म अंगात घातला की आम्ही नर्सेस आमच्या कर्तव्यात आपोआप निर्णय घ्यायला शिकतो. मी स्वतः आई आहेच आणि एक नर्स आईच्या भावनेने पेशंट सांभाळते. एकदा आम्ही ड्युटीवर गेलो की घर, घरातल्या काळजी विवन्चना मनाबाहेर टाकून आमचं काम करतो. त्या दिवशी सुद्धा मी हेच केलं. प्रत्येक रुग्ण ही आई होण्याच्या मार्गांवर आहे आणि त्यांना संरक्षण देणे एवढेच माझ्या डोक्यात होतं...ह्या सगळ्या चित्तथरारक घटना घडून गेल्यानंतर खूप दिवस हे घटनाचक्र आठवून त्रास झाला. पण आपण कर्तव्य बजावल्याचा अनोखा आनंद झाला.”
आज सर्व स्तरातून सिस्टर अंजली कुलथे ह्यांचा सत्कार होतो आहे. आणि ते उचित सुद्धा आहे.

**खरंच ह्या पेक्षा जास्त मोठी मानवंदना कशी असेल नाही का?**





# अध्यात्म

ज्योतिर्विद
उदय दुदवडकर,
कुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४



## दिवस कार्ये

**(पुढचा भाग)**

**मागील भागात आपण प्रत्येक दिवशी नऊ दिवस श्राद्धे करावयाची माहिती घेतली. शवदहनविधी उरकल्यानंतर दिवंगत व्यक्तीचे प्रेतत्व निवारण करण्यासाठी पुढील ९ दिवस ' नवदिनश्राद्धे ' केली जातात. यांस ' अवयवश्राद्धे ' असेही संबोधले जाते.**

यःप्रमाणे प्रत्येक दिवशी नऊ दिवस करावे. त्यानंतर पहिल्या दिवशी... दुसऱ्या दिवशी... नवव्या दिवशी.. याप्रमाणे प्रत्येक दिवसाच्या श्राद्धात पुढील प्रमाणे एक एक पिंड त्रिकोणी वेदिका करून त्यावर दर्भ ठेवून दर्भावर द्यावा व पुढील प्रमाणे त्या त्या दिवसांनुसार मंत्र म्हणून पितृतीर्थावरून अंगठ्याने तिळाचे पाणी पिंडावर द्यावे.

**१) पहिल्या दिवशी म्हणावयाचा मंत्र-**
' ... दिवंगताच्या गोत्राचे नाव.. गोत्रस्य ... दिवंगत असे नाव ... प्रेतस्य आद्येहनी शिरोवयव निष्पत्त्यर्थ एष भक्तपिंड स्तवोपतिष्ठताम्। तस्योपरी तिलोदकं उपतिष्ठताम्। '
**२) दुसऱ्या दिवशी म्हणावयाचा मंत्र-**
' ... दिवंगताच्या गोत्राचे नाव.. गोत्रस्य ... दिवंगताचे नाव ... प्रेतस्य द्वितियेहनी चक्षु:, श्रोत्र, नासावयव निष्पत्त्यर्थ एष भक्तपिंड स्तवोपतिष्ठताम्। तस्योपरी तिलोदकं उपतिष्ठताम्। '
**३) तिसऱ्या दिवशी म्हणावयाचा मंत्र-**
' ... दिवंगताच्या गोत्राचे नाव.. गोत्रस्य ... दिवंगताचे नाव ... प्रेतस्य तृतीयेहनी भूज ,वक्ष, ग्रीवा, मुखावयव निष्पत्त्यर्थ एष भक्तपिंड स्तवोपतिष्ठताम्। तस्योपरी तिलोदकं उपतिष्ठताम्। '
**४) चवथ्या दिवशी म्हणावयाचा मंत्र-**
' ... दिवंगताच्या गोत्राचे नाव.. गोत्रस्य ... दिवंगताचे नाव ... प्रेतस्य चतुर्थेहनी पर्ष्णि, कुक्षी, कटी, नाभी, गुदा, लिंगावयव निष्पत्त्यर्थ एष भक्तपिंड स्तवोपतिष्ठताम्। तस्योपरी तिलोदकं उपतिष्ठताम्। '
**५) पाचव्या दिवशी म्हणावयाचा मंत्र-**
' ... दिवंगताच्या गोत्राचे नाव.. गोत्रस्य ... दिवंगताचे नाव ... प्रेतस्य पंचमेहनी उरु, जानू, जंघावयव निष्पत्त्यर्थ एष भक्तपिंड स्तवोपतिष्ठताम्। तस्योपरी तिलोदकं उपतिष्ठताम्। '
**६) सहाव्या दिवशी म्हणावयाचा मंत्र-**
' ... दिवंगताच्या गोत्राचे नाव.. गोत्रस्य ... दिवंगताचे नाव ... प्रेतस्य षष्ठेहनी गुल्फा, पदांगुली, मर्मादि अवयव निष्पत्त्यर्थ एष भक्तपिंड स्तवोपतिष्ठताम्। तस्योपरी तिलोदकं उपतिष्ठताम्। '
**७) सातव्या दिवशी म्हणावयाचा मंत्र-**
' ... दिवंगताच्या गोत्राचे नाव.. गोत्रस्य ... दिवंगताचे नाव ... प्रेतस्य सप्तमेहनी अस्थी, मज्जा, शिरावयव निष्पत्त्यर्थ एष भक्तपिंड स्तवोपतिष्ठताम्। तस्योपरी तिलोदकं उपतिष्ठताम्। '
**८) आठव्या दिवशी म्हणावयाचा मंत्र-**
' ... दिवंगताच्या गोत्राचे नाव.. गोत्रस्य ... दिवंगताचे नाव ... प्रेतस्य अष्टमेहनी नख, रोमादि अवयव निष्पत्त्यर्थ एष भक्तपिंड स्तवोपतिष्ठताम्। तस्योपरी तिलोदकं उपतिष्ठताम्। '
**९) नवव्या दिवशी म्हणावयाचा मंत्र-**
' ... दिवंगताच्या गोत्राचे नाव.. गोत्रस्य ... दिवंगताचे नाव ... प्रेतस्य नवमेहनी मर्म, (दिवंगत पुरुष असेल तर) वीर्यादी / (दिवंगत स्त्री असेल तर) रजादि सर्वावयव निष्पत्त्यर्थ एष भक्तपिंड स्तवोपतिष्ठताम्। तस्योपरी तिलोदकं उपतिष्ठताम्। '

दर दिवशी प्रत्येक दिवसाचे कार्य करावयाचे झाल्यास वरील प्रमाणे त्या त्या दिवशी मंत्र म्हणून त्या त्या दिवसाचे पिंड वरील प्रमाणे द्यावेत. एकाच वेळी एकाच दिवशी ९ दिवसांची कार्य करून पिंड द्यावयाचे झाल्यास संकल्पात किंचित बदल करून पुढीलप्रमाणे संकल्प करून वरील प्रमाणेच नऊ दिवसांचे पिंड एकाच दिवशी एकाच वेळी दिले जातात.

एकाच वेळी, एकाच दिवशी नऊ दिवसांचे श्राद्ध कार्य करावयाचे झाल्यास करावयाचा संकल्प 'दिवंगताच्या गोत्राचे नाव घ्यावे... गोत्रस्य ... दिवंगत व्यक्तीचे नाव घ्यावे... प्रेतस्य प्रेतत्व निवृत्त्या उत्तम लोक प्राप्त्यर्थ मृताहे प्रथम दिन आरोग्य अष्टमदिनापर्यंत अंतरित तत तत दिनविधी तथाच नवम दिनविधी च करिष्ये। ' (पाणी सोडावे) ' तथा दाहजनीत तापोपशमनार्थ मृत्तिका स्नानादि करिष्ये। ' (पाणी सोडावे

वरील प्रमाणे पिंड देऊन झालं नंतर पिंडांची पूजा करावी. आमान्नाचा (न शिजवलेल्या अन्नाचा) नैवेद्य दाखवावा. विडा दक्षिणा श्रीफळ इत्यादी द्यावेत. वेळ देऊन उत्तर याचे पाणी द्यावे. पिंडांना दरवाजा स्पर्श करून पिंड चाळवावेत.

' अनादी निधनोदेव: शंखचक्रगदाधर:। अक्षय्य: पुंडरिकाक्ष: प्रेतमुक्तिप्रदो भव ।। ईदं पिंडदान सकुश तिलोदकं। प्रेताप्याय या नमस्तु।। अस्तु प्रेताप्यायनम्।। ' असे म्हणून तिळाचे सर्व पाणी अष्यावर अंगठ्याने देत
म्हणावे,

**' अभिरम्यताम्। अभिरम्यतास्म:।।**


यानंतर पिंड पाण्यात विसर्जित करून स्नान करावे. इथे नऊ दिवसांचे कार्य संपन्न होते

# सोनेरी दुनिया



श्री. श्रीराम शेटये.
नालासोपारा.

## 'गुलशन बावरा' एक अवलिया गीतकार.



चित्रपट होता 'सट्टा बाजार' बलराज सहानी आणि मीना कुमारी सारखे दिग्गज कलाकार यात भुमिका करीत होते. एकदा चित्रपटाचे डिस्ट्रीब्यूटर शांतीलाल पटेल स्टुडिओत आले होते. तेंव्हा त्यांनी चित्रपटाच्या गीतकाराला भेटण्याची ईच्छा व्यक्त केली. संगीतकार कल्याणजी आनंदजी यांनी गीतकाराला बाहेर बोलावले. विस्कटलेले केस, रंगीबेरंगी कपडे बावळट चेहऱ्याचा किरकोळ बांधा, एक मुलगा बाहेर आला. शांतीलाल पटेल त्याला बघताच शॉक झाले. ते म्हणाले,

**"अरे ए तो बावरा है ,ए क्या गाने लिखेगा?"**

चित्रपट सट्टाबाजार प्रदर्शित झाला 'तुम्हे याद होगा कभी हम मिले थे मुहब्बत के राह मे मिलके चले थे ' या गाण्याला सिनेरसींकानी डोक्यावर घेतले. चित्रपटतील सर्वच गाणी हिट झाली. पण त्या दिवसापासुनच या गीतांचे गीतकार गुलशन मेहता यांचे नाव मात्र 'गुलशन बावरा' पडले. म्हणून चित्रपटाच्या पोस्टरवर आणि पडद्यावरही तेच नाव झळकू लागले.

१२ एप्रिल १९३७ साली लाहोर मधील शेखपुरा या गावी गुलशन बावरा यांचा जन्म झाला. लहानपणीच भारतपाक फाळणी झाली. त्यावेळी झालेल्या जातीय दंगलीत त्यांच्या डोळ्या देखत त्यांच्या वडीलांची तलवारीने हत्या करण्यात आली. आईला बंदुकीची गोळी घालून ठार केले. गुलशन व त्याचा छोटा भाऊ शेतात लपून राहिल्यामुळे वाचले. मिलिटरी च्या ट्रकमधुन लपतछपत जयपुर ला आपल्या बहिनीकडे आले व राहिले. तेथे शिक्षण पूर्ण झाल्यावर 'गुलशन बावरा' मुंबईत रेल्वेमध्ये नोकरी करीत होते. गाण्यांची आवड होती म्हणून गाणी लिहून वेगवेगळ्या चित्रपट स्टुडिओत फिरून आपली गाणी संगीतकारांना दाखवत असत. अशा वेळेस कल्याणजींना त्यांनी आपली गाणी दाखवली. कल्याणजींनी त्यांना 'चंद्रसेना' चित्रपटाची गाणी लिहिण्यासाठी संधी दिली.

अशीच एक विलक्षण कहाणी आहे. सन १९७२ मध्ये प्रकाश मेहरांच्या 'जंजीर' चित्रपटाच्या गाण्यांची रेकॉर्डिंग फेमस स्टुडिओत सुरू होती. लता मंगेशकर आणि महमद रफी यांचे गाणे रेकॉर्डिंग चालू होते. संगीतकार होते कल्याणजी आनंदजी काहीवेळा टेक घेतल्यावर गाणे ओके झाले. परंतु लता मंगेशकर समाधानी नव्हत्या. लताजीना वाटत होते गाण्यात काहितरी राहून गेले आहे. लता दिदि नी कल्याणजी आनंदजी ना गाण्याचा परत एक टेक घेण्यास सुचविले. कल्याणजी आनंदजी यांनी महमद रफी यांना परत एकदा रीटेक घेण्यास बोलावले. परंतू तो रमजान चा महिना चालू होता. रोजा चालू असल्यामुळें रफी साहेबांनी निर्जल उपवास पकडला होता. अन्न पाण्यावाचून रफी साहेंबाचा घसा सुकला होता. रोजा सोडायला अजून एक तास बाकी होता. रफी साहेब आपल्या गाडीत जाऊन बसले ते थोडे नाराजच होते. ओके झालेले गाणे परत का गायचे? एवढ्यात गुलशन बावरा धावतच त्यांच्या मागे गेले. गुलशन बावरा म्हणाले, "रफी साहब आप को मालूम है यह गाना किस पर फिल्माया जाना है? रफी साहेब रागाने म्हणाले, " क्या दिलीप कुमार पर पिक्चराईज्ड हो रहा है यह गाना?" तेंव्हा गुलशन बावरा म्हणाले, "आपके ईस खादिम पर!" रफी साहेब आश्चर्यचकित झाले. त्यांचा राग शांत झाला. "अरे तुने पहले क्यु नही बताया ? चल फटाफट स्टुडिओमे चल ।" जेव्हा रफी साहेब स्टुडिओत आले तोपर्यंत संगीत वादक कलाकार स्टुडिओतून बाहेर आले होते.

रफी साहेबांनी त्यांना परत आत बोलावलं. रफी साहेब लता दिदिना सोबत घेऊन आत आले. असे काही गाणे गायले की गुलशन बावरा यांच्या व्यक्तीरेखेला ते फीट बसले. ते गाणे होते,

**" दिवाने है दिवानो को ना घर चाहिए मुहब्बत भरी एक नजर चाहिए ।"**

जंजीर चित्रपटात गळ्यात पेटी बांधून गाणे गाणारा तो अभिनेता ज्याच्यावर हे गाणे चित्रीत झाले आहे ते गुलशन बावरा आहेत. अमिताभ पोलीस इन्स्पेक्टर आणि जया भादूरी चक्कू सूरीला धार लावणारी गरीब मुलगी दाखवली आहे. अमिताभ चा हा पहिला सुपरहीट चित्रपट होता.या चित्रपटाने अमिताभ रातोरात स्टार झाला.

गुलशन बावरा यांची अनेक सुपरहीट गाणी आहेत. "तुम्हे याद होगा कभी हम मिले थे मुहब्बत के राह मे मिलके चले थे । " 'सट्टा बाजार' (१९५९ ),"पंछी अभी तू है जाल मे "नीली आखे' (१९६२) "रूठे हो सनम तो फिर क्या है" हे लाल बांगला (१९६६) मध्ये. "चांदी की दिवार न तोडी प्यार भरा दिल तोड दिया ।" विश्वास (१९६९) मध्ये. अशी अनेक सुपरहीट गाणी गुलशन बावरा यांनी लिहिली. उपकार चित्रपटतील त्यांचे
"मेरे देश की धरती सोना उगले उगले हिरे मोती ।"हे महेंद्र कपूर यांच्या आवाजातील गाणे शतकातील सर्वोतम गीत आहे. हे देशभक्तिपर गीत आजही गाजत असते.
" गीत लिखना तो ईश्वर की देन है" असे गुलशन बावरा म्हणायचे.

वाचायलाच हवे असे

# आगोट

डॉ. प्रेमा मेणशी,
बेळगावी-कर्नाटक

मी शहरात खेळलेली, मोठी झालेली. मग आपोआपच खेड्यांबद्दल, शेतकरी जीवनाबद्दल, त्यांच्या सुखदु:खाबद्दल तिथल्या काबाडकष्टांबद्दल फक्त अन् फक्त पुस्तकी माहिती. अशात आगोट हा शब्दच आज वयाच्या सत्तरीत पहिल्यांदा ऐकला आणि अज्ञानाचा कळस म्हणजे क्षणभर मला वाटलेलं ही आगीशी निगडित एखादी वस्तू, प्रथा, परंपरा, विचार असेल नाही म्हणायला बेगमी हा शब्द माहित होता आणि महत्वाची बात म्हणजे या बेगमीचा संबंध बेगमांशी नव्हे तर गोरगरीबांच्या, मध्यमवर्गियांच्या आयोजकशक्तीशी आहे, हेही ठाऊक होतं

याबाबतीत माझी गुरु स्वल्प शिक्षित, चतूर, शहरी आणि धोरणी आईच होती. हिवाळ्यात लिंबाचं लोणचं, लिंबू शरबतासाठी रस, लिंबाचं तोक्कू हे साठवणीचे पदार्थ तयार करुन ते सूर्यप्रकाशात ठेवून शक्य तितके निर्जंतुक करून त्यांची बेगमी वर्षभरासाठी करून ठेवायची, हे व्रत तिनं आयुष्यभर म्हणजे सक्रिय असेपर्यंत पाळलं आणि अशा रितीने गोळा झालेल्या लिंबाच्या साली उन्हात वाळवून त्याचा उपयोग केस धुण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या रिठा + शिकेकाईच्या पुडीत केसांना चमक यावी यासाठी करायची तिची पध्दत होती.


उन्हाळा सुरू झाला की विविध सांडगे, पापड, कुरडया, कैरीचं लोणचं, गुळांबा,साखरांबा, वर्षभर कैरीचं शरबत करण्यासाठी कैरीचं घरगुती स्कॅश, आवळ्याची सुपारी, कैरीचे काप, श्रीखंडगोळ्या, लाल तिखट, मसाला तिखट, गरम मसाला इ. इ.सगळी बेगमी व्हायची चिंचेच्या मोसमात चिंचेचं तोक्कू पण व्हायचं आणि उन्हाळ्यात शेवया, पायसम् म्हणजे खीरीसाठी गव्हल्या, नखुल्या यांचीही बेगमी करायची हा पण एक मोठा अध्याय असायचा.

तिच्या हाताखाली कामं करता करता ही सारी कामं शिकले व साठवण आणि बेगमीचा अर्थ कळत गेला आणि हे सर्व साधण्यासाठी पैशाची बचत आणि नियोजन ज्या रितीनं केलं जायचं त्याचंही प्रात्यक्षिक पाहायला मिळालं.

**आज माझ्या लक्षात येतय वापरा आणि फेकून द्या या तत्वापेक्षा, आपल्या वाडवडिलांनी पाळलेलं तत्व निसर्गानं देऊ केलेल्या प्रत्येक कणाचा व थेंबाचा एक नाही तर दुसरा उपयोग करून त्याला सार्थकी लावा भले त्यासाठी जरा जास्तीचे प्रयत्न वा काम करावे लागले तरी हरकत नाही याचा किती सर्वतोपरी फायदा झालाय याचा साक्षात्कार होतोय.**

सैन्यात एक उक्ती प्रसिद्ध आहे
**“Sweat in peace so that you don't bleed in war "**

जीवन संघर्षातही संकटकाळी त्रेधा तिरपिट होऊ नये म्हणून निष्कंटक काळात केलेलं नियोजन अती महत्वाचं असतं म्हणूनच आगोट वा बेगमीला त्रिवार वंदन!



# सरकारी योजना/नोकरी

## फळ आणि धान्य महोत्सव अनुदान योजना

आंबा, संत्री, गोड संत्री, द्राक्षे इत्यादी हंगामी फळे तसेच उत्पादकांकडून थेट ग्राहकांपर्यंत धान्य विक्रीसाठी उत्सव आयोजित करण्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे.

**लाभार्थी -**

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्या, कृषी मालाच्या विक्रीसाठी स्थापन करण्यात आलेल्या सहकारी संस्था, सरकारी विभाग, उत्पादक सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, सार्वजनिक धर्मादाय ट्रस्ट आणि कायदा 1860 अंतर्गत नोंदणीकृत संस्था

**नियम आणि अटी -**

- उत्सवाचा कालावधी किमान ५ (पाच) दिवसांचा असावा.
- महोत्सवासाठी प्रति स्टॉल रु.2000/- आर्थिक सहाय्य देय असेल.
- महोत्सवातील किमान 10 आणि जास्तीत जास्त 50 स्टॉलसाठी अनुदान देय असेल.
- कमाल अनुदान रु. महोत्सवासाठी 1.00 लाख देय असतील.
- फळ व धान्य महोत्सव आयोजित करण्यासाठी लाभार्थ्यांना आर्थिक वर्षातून एकदा अनुदान देय असेल.

- महोत्सवाच्या प्रचार आणि प्रसिद्धीसाठी सहप्रायोजक म्हणून कृषी पणन मंडळाचे नाव देणे आयोजकांना बंधनकारक असेल उदा. बॅनर, जाहिराती, बातम्या, पार्श्वभूमी, हँड बिल इ.
- कृषी पणन मंडळाला महोत्सवात स्टॉल हवे असल्यास आवश्यक स्टॉल मोफत देणे आयोजकांना बंधनकारक असेल.
- महोत्सवाचा अहवाल व काही निवडक छायाचित्रे कृषी पणन मंडळाच्या 'कृषी पणन मित्र' मासिकात प्रसिद्धीसाठी पणन मंडळाकडे सादर करावीत.
- महोत्सवातील गुणवत्ता, दर आणि इतर अनुषंगिक व कायदेशीर बाबींसाठी कृषी पणन मंडळ जबाबदार राहणार नाही. मात्र, स्टॉलधारकांना केवळ चांगल्या दर्जाच्या उत्पादनांचीच विक्री करणे बंधनकारक असेल. याची खात्री करणे आयोजकांवर अवलंबून असेल.
- महोत्सवाच्या आयोजनासाठी कृषी पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयाच्या शिफारशीसह संपूर्ण प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.
- हा सण केवळ उत्पादकांसाठी असल्याने व्यापाऱ्यांना त्यात सहभागी होता येणार नाही किंवा बाजारातून उत्पादन आणून विकता येणार नाही.
- उत्सवासाठी इतर कोणत्याही शासकीय योजनेंतर्गत घेतल्यास या योजनेंतर्गत अनुदान देय राहणार नाही.

- १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र लिहिणे बंधनकारक आहे. 100/- वर नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य आहेत.
- राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्या एका आर्थिक वर्षात जास्तीत जास्त पाच वेळा महोत्सवाचे आयोजन करू शकतात आणि सर्व सणांसाठी मिळून ५० स्टॉल्स (प्रति महोत्सवात किमान १० स्टॉल) प्रति स्टॉल रु. 2000, कमाल अनुदान रु. 1.00 लाख.
- महोत्सवाच्या आयोजनासाठी अग्निशमन विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र (फायर एनओसी) घेणे बंधनकारक असेल.

## पद्मश्री बाबासाहेब वेंगुर्लेकर महाविद्यालय सिंधुदुर्ग भरती २०२४.

### पद्मश्री बाबासाहेब वेंगुर्लेकर महाविद्यालय सिंधुदुर्ग भरती २०२४.

⇒ पदाचे नाव: प्राचार्य आणि सहाय्यक प्राध्यापक.
⇒ एकूण रिक्त पदे: 15 पदे.
⇒ नोकरी ठिकाण: सिंधुदुर्ग.
⇒ अर्ज करण्याची पद्धत: ऑनलाइन (ई-मेल).
⇒ अर्ज प्रक्रिया सुरू होण्याची तारीख: 16 मे 2024.
⇒ अर्ज करण्याची शेवटची तारीख: 25 मे 2024.
⇒ आवेदन पाठवण्याचा ई–मेल पत्ता: career.pbvm@gmail.com

**पदाचे नाव:**

- प्राचार्य

Masters degree in any facualty with 55% with PhD in any faculty, Retierd Principal

- सहाय्यक प्राध्यापक.
- MSC CS B+
- MSc IT B+
- MCA IT B+

--------------------- 7 Post

- M.Com (Accuntancy) B+ NET/SET

----------------------------------------------- 6 Post

- MSC Maths B+
- MSC Statastic B+

----------------------------- 1 Post

Last Date For Application

25th May 2024

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ऍड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक-विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क:rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क:sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862




## भावाशीची इच्छा....

रीना पास्ते परब
सातुळी सावंतवाडी

सुरगो धडधडावन उठलो. त्याचा बनयान घामान चिप भिजान गेला. बॅटरी मारून घड्याळ बगल्यान तर फाटेचे साडे चार वाजलले. बाजूचा टावेल घेवन त्याना घाम पुसलो. गरमी असली तरी आजूबाजूक झाडाझुडपा असल्याकारणान फाटेच्या वगताक तसा थण वाटता. तरी दुकू सुरग्याक दरदरावन घाम इल्लो. सुरग्यान हात लाम करून तामयातला पानी घेतला. पानी पिवन त्याका वायच बरा वाटला. सुरगो कायम लोट्यार निजा. बायल, चडू वळयत निजत. झिल गस्तालधरना गोयाक कामाक जाता. तो तडेच असता. आयतवारा इलो तर यता. सुरग्याचा झिलावांगडा तसा जास्ती पटना नाय. इलो तरी गाळी खावचे लागतत हुनान तो तडेच रवाक बगता.

सुरगो झिलाक बगून घेना नाय ह्या खरा असला तरी तो चडवाक खूप बरो करता. बायक बगल्याखेरीज तो भायर पडणा नाय. बायन अवनू बोर्डाची परीक्षा दिली हा. सुरग्यान बायक साद घातल्यान. "गो बाय..." बायची जाग नाय तसो तो परत ढकाललो. त्याका निज लागाना. मेल्लो भावस सपनात सामदिस्टी गमलो. आता डोळे ढाकल्यान काय डोळ्याफुडे मेल्ल्या भावशीचा त्वांड दिसा. सुरगो धीरिस काळजाचो असलो तरी त्याका आज भय वाटाक लागलो. भावशीक मरान तीन वर्सा जाली. तो सपनात कसो काय इलो ह्या त्याका कळाना. असा कदवा जावक नाय होता. सुरगो ईचार करी होतो. इचार करीत करीत तेचो डोळो लागलो. भावस परत फुड्यात उभो रवलो. काय तरी बोलाक जाय होतो तितक्यात सुरग्याक बायलेन साद घातली. सुरग्यान आंग काढल्यान. तो जागो जालो. "काय ओ... भियालास कित्या...?" सुरग्याचे बायलेन ईचारल्यान... "काय नाय गो... तिया बेगीन कित्या उठलं...?" घड्याळात बगीत सुरगो बोला होतो. साडे पाच वाजलले. "इसारलास... राती घागरी रिक्यामी करून ठेयलय ते... पानी भरूया हुनान सांगलास माका... लग्नाक गेलव काय ययसर सांज जातली. चला उठा..." सुरग्याचे बायलेन बोलता बोलता फुडली लायट लायली. घागरी घेवन सुरग्याची बायल फुडे सरली. सुरगो चूळ भरून पाटसून जाता हुनासर तेचे बायलेन दुड भरली. सुरग्यान पानी हाडून वतुक सुरवात केली. याक तपला, याक डराम भरून घागरी दोगायनी उतरून पेडयेर ठेयले.

इतक्या पानी भरतत हुनासर बरा उजवाडला. सुरग्यान न्हानयेत आग घातली. चडवाक उठवन हतरुना लागी केल्यान. आवशीन सांगलेन हुनान चडवान कंटाळत चवरी भोवडतत तसो कचरो काढलो नि ता दात घाशीत मोरयेत गेला. सोमता न्हावन धुवन भायर इला. आवशीन तवसर चाय केली, भाकरी भाजली. सुरगो न्हावक गेलो पुन तेच्या टकलेत इचार सुरू होते. आंगार चार तामये पानी वतून तो भायर इलो. बायलेन चाय भाकरी फुडे केली. चायचो घोट घेताना त्याका आठावला... भावगो काय तरी सांगताहा माका... तेचि काय तरी इच्छा असतली. चवकशी करु व्हयी... सांजे आपाक घेवन जातंय. तो बरोब्बर व्हरतलो माका. लग्नासून इलय काय आपाक गाठतय. सुरग्यान कसोसो दिस घालयल्यान नि सांजे तो आपावांगडा यका माणसाक भेटाक गेलो. सुरग्यान त्याका सगळा सांगला. त्या माणसान सोमता ईचारल्यान... "भावाशीच्या झिलाचा लगीन कदी करतलं...? तुजो भावस तीन वर्सा वाट बगून तुका ह्याच सांगाक इल्लो... पुतनयाच्या लग्नाचा तिया बग आता... भावशीची इच्छा पुरी कर..." त्या मानसान असा सगळा सांगल्यार सुरग्याची ट्यूब पेटली. त्याना थयसूनच मुंबैक होनशीन फोन लायलो. "बाब्याच्या लग्नाचा बगू व्हया अवनू... मिया सांगतय माज्या म्हायतीतल्या लोकांका... बाब्याक फोटो पाठवन देवक सांग... कामावरसून इलो काय माका फोन करूक सांग..." असा काय माय बोलान सुरग्यान फोन ठेयलो. सुरगो घराक इलो त्याना बायलेक घडलंला सगळा सांगला. तिना दुकू बाब्याच्या लग्नाचा अवनू बगूया हुतला. सुरगो बसल्या बसल्या फोन करून लोकांका होलम आसा काय ईचारुक लागलो...






## झाडा पेडा



वयल्यांचा कवग्या,
मालवण- सिंधुदुर्ग.

आमची म्हातारी आये म्हणायची, आजच्या माणसान सद्धरम सोडलो गे बाय. आताच्या माणसाक कोण भोक्तो नाय. पुर्वी माणूस भूताखेतांक तरी घाबरायचो. देवाधर्माक घाबरायचो. त्यामुळा ग्रामीण भागात अनेक ठिकाणी वनराई शिल्लक होती. पण गेल्या काही वर्षांत माणसान जंगला काय शिल्लक ठेवल्यान नाय. वायच खय जागा दिसली, की ती सपाट कर, लेवल कर, लाव पोकलेन आणि बांध बंगले. अशे बंगले बांधून बांधून आता खय जागो शिल्लक नाय ठेवल्यानी.

माका बाय माझा ल्हानपण आठावता. किती डोंगर होते ना हो गावागावात. लांबून बघताना सगळे गाव हिरवेगार दिसायचे. हिरव्यागार डोंगराच्या कुशीत वसलले गाव, लाल कौलारु घरा नि आजूबाजूक गुराढोरा. किती मस्त दिसायचे गाव! आपल्याच गावातल्या रानावनातला जंगली लाकूड सामान वापरून बांधलली घरा इको फ्रेण्डली होती. खय सिमेंटचे पत्रे नाय होते की कोणाच्या घराक प्लास्टर. लाल मातीच्या कावेन सारवलेले नि गिलावो केलला मातयेचे भिंती, वर चुन्यान काढलली चित्रा, वेलबुट्टी मस्त दिसायची. घराभोवती आंब्या फणसाची झाडा. होती. परड्यात जांभळ, शिवण, साग, शेगलाची झाडा होती. घराभोवती इतकी हिरवळ नि झाडा पेडा असतना गरम कसा होयत? वातावरण, तापमान अगदी गिमात पण कंट्रोल मध्ये होता.

आताच्या लोकांक घराजवळ मोठी झाडा चलनत नाय. घरांचो शो बिघाडता. पतेरो जमा होता. तो काढूक घोपान कोणाक? पण ऐकलास काय, झाडा पेडा नाय तर घराक शोभा नाय. झाडा पेडा नाय तर घरात थंडावो नाय. झाडा पेडा नाय तर घर प्रसन्न नाय. आताचा कोकण ह्या असा झाडा पेडाशिवाय भकास दिसता. म्हणून माका असा वाटता,

आतापर्यंत झाला ता झाला. त्येचो विचार करून काय फायदो नाय. पण ह्येच्याफुडे तरी आपण आपला पर्यावरण जपाक होया. झाडापेडा लावक होयी. असलली जपाक होयी. झाडापेडाची काळजी घेवक होयी. मिया तर बाय माझ्या घरात सांगान ठेवलंय. आपणाक कोणी अडाणी म्हटल्यान तरी चलात. कोणी गावंढळ म्हटल्यान तरी चलात. पण आपण झाडापेडा लावया. झाडापेडा वाढवूया. कारण झाडा पेडा टिकली तर आपण जगतलव. नायतर आपला काय खरा नाय. पण तुम्ही कधी ओ सांगतलास तुमच्या घरात?



## आठवणींच्या गोष्टी

राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३१४४३५६..

# मोठ्याचं मोठेपण

"मोठ्याचं मोठेपण, गरीबांला विचारतो कोण ?"अस माझी आई नेहमीच म्हणायची. तिच्या मनात कुणाविषयी आकस, द्वेष नव्हता पण स्वतः बद्द्लची परिस्थितीची एक खंत होती. आपण गरीब आहोत हातावरच पोट म्हणजे आली मजुरी करायची, पुरेशी शेती, गुरे नाहीत. असेल त्या दिवशी खाण नसेल तेंव्हा उपवास, राहायला धड ठिकाणा नाही, कसली हौस मौज नाही. त्याच दु:ख नव्हत ती समाधानीच होती. कुणी नातेवाईकही आपल्याकडे फारसे येत नाहीत, कुणाकडे गेलो तर तुच्छतादर्शक पाहतात मदत नाहीच पण ही आपल्या कडे चार पैसे एखादी वस्तू, कपडा मागितला तर, कदाचित त्यांना अशी भीती असावी. त्यामुळं येणारी नातेवाईकही कमीच. कारण यांच्याकडे गेलो तर जेवणं सोडाच पण चहाही मिळणार नाहीच याची त्यांना खात्रीच. उलट गेलो तर चार पैसे लाजे खातर द्यावे लागतील ही त्यांना भीत. घरी कधी खायला नसले तर उसने मागतानाही आमच्याकडेही नाहीच असंच आईला ऐकावं लागले कारण दिल्यावर ही परत कधी देणार अशी शंका. आईंन कधीच कुणाचे पाच पैसे वा उसने धान्य घेतलेले द्यायला विसरली नाही. तिचा व्यवहार चोख असायचा. कुठल्याही सार्वजनिक कामात सहभाग पण कधीच पुढे पुढे नसायची. पडेल ते काम करायची. हे सर्वच मी पाहिलं आहे. बाबा ही याच स्वभाव, विचारांचे. आपल काम नी आपण, ना कुणाच्या अध्यात मध्यात. नेहमीच सकारात्मक द्रुष्टीकोन. अगदी योग्य जोडी आईबाबांची. धारावीच्या झोपडपट्टीत बाबांचा दरारा होता. म्हणजे शब्दाला मान होता वखारीत लाकडे फोडत, पण भले भले वचकून होते. तुझा तू मोठा मला काय त्याच. मी कमवतो मी खातो. स्वाभिमानी जगणं. अकारण कुणाच्याही मागे पुढं फिरणे नमस्कार, खोटी स्तुती करून मर्जी संपादन करणे बाबांना जमले नाहीच. हेच गुण आम्हा भावंडां मधी आहेत. आम्ही समोरचा योग्य वाटला तर मनःपूर्वक आदर करतो. खोटी स्तुती करणे, लिहिणे, गाणे मी टाळतो त्यामुळं मला काहींचा कटूपणा घ्यावा लागला. मला महत्वाचे ठिकाणी वेळ प्रसंगी डावलले गेले. दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणे ,त्याला खुश करून काही घेणे मलाही जमत नाही. आपली योग्यता असेल तर मिळेल सार आपोआप आणि काही अंशी न मागता माझ्या गुणवत्तेला न्याय मिळालाही आहे.

आईबाबांचा आपले चांगले दिवस कधीतरी येणारच हा आत्मविश्वास होता. "ज्यांचे बाल त्याचे फिटतील हाल "अशीही एक म्हण आईच्या मुखात असायची. कष्ट करून, भीक मागून खावे पण लांडी लबाडी ,चोरी करून ,खोट बोलून खाऊ नये. इज्जतीन वागावे. हे असले बोल माझ्यासाठी अनमोल ठरले आहेत आईबाबांना खोटा मोठेपणा खपायचा नाहीच पण चांगल्याच कौतुकही तोंडभरून करण्यात कधी कुचराई नाहीच. कुणाची निंदानालस्ती त्यांच्या तोंडी नसायची. हे जग दिल्या घेतल्याच असत. "असतील शीते तर जमतील भुते "म्हणायचे. तुमच्याकडे वैभव, गाडी बंगला असेल तर लोक धावतील, गोड बोलतील, गुण गातील. तो कसा मोठा झाला ते बघत नाहीत. इथं दोन प्रकारे मोठं होता येतं- एक कष्टाने आणि लबाडीने मात्र लबाडीच जास्तकाळ टिकत नाहीच. जग मात्र अशा खोट्याच्या माग धावत रहात आणि हुशार ,सज्जन, गुणी गरीबांला मात्र कवडीमोल समजत. कुणाच्या तरी लग्नाला जाण्यासाठी आईला चुलत जावाकडे शेजारनीकडे साडी मागताना मनात संकोच असायचा. मुंबईत मलाही एका नातेवाईक याने आमच्याकडे येताना अस गबाळ्यासारख यायचे नाही जरा व्यवस्थित कपडे घालून येत जा असा सल्ला मला दिला होता. मी ही नंतर कधी त्यांच्याकडे गेलो नाही. डॉक्टरानी दिलेले जुने सफारी ,शर्ट पॅण्ट आणि पायात पायल ची स्लीपर असायची तेंव्हा, आता ते दिवसही संपले. पण काहींचे बोल ध्यानात राहिले. माझ्या जन्माआधी पासून आई मुंबईत राहिली. नऊ दहा वर्षानी गावी आली तोवर घर मोडून, घराचे वासे सरपण म्हणून आणि चिरे बांधासाठी काहींनी वापरले. आईन तेंव्हा शहाण्या जाणत्यांना सांगितलं, विचारलं पण "हाज़िर तो वजीर "तू एवढ्या वर्षानी गावात येऊन आता विचारतेस हे बोल ऐकायला मिळाले. चार वर्षांत दुसऱ्याच्या पडवीत एका कोपऱ्यात दहा बाय दहाच्या जागेत आमचा वावर पण आईन धीर सोडला नाही. शांत संयमी पण तेवढीच प्रसंगी कठोरही बनली. शिक्षणाच महत्व ओळखून तीन माझ्या नियमित शाळेत जाणे आणि अभ्यास याकडे लक्ष दिलं. तिचा नजरेचाच मला धाक होता. माझ्या खाण्याची आबाळ केली नाही पण अभ्यास न करण्याचे लाड खपवून घेतले नाहीत. चाळीसवर्षापूर्वी शाळेत मला काही मुलांनी शिव नकोस,बाजुला बस, पाण्याच्या कळशीला हात लावू नकोस तू बुद्ध आहेस ना म्हणाली. मी घरी येऊन आईला सांगितलं ती शाळेत आली. गुरुजींना सांगितलं ते ही अवाक झाले पहिल्यांदा असं कुणीतरी पालक यांनी जाब विचारल्याच आश्चर्य वाटलं ते खूप चांगले गुरुजी होते. त्यांनी त्या मुलांना समजावून सांगितलं मग मात्र कुठल्याच मुलांनी मला त्रास दिला नाही. हा एक माणसात भेद सांगणारा कटू अनुभव मी घेतला.

चाळीसवर्षापूर्वी असं चित्रं सर्वत्र कमी अधिक प्रमाणात होत. गावात पालकांच किती वजन आहे यावरून विद्यार्थी यांना जवळ दूर करणारे पाहिले आहेत ..सरपंच ,पोलीस पाटील ,वाडीप्रमुख ,सुशिक्षित पालक यांच्या मुलांना प्राधान्य क्रम अगदी जाणीव पूर्वक दिला जायचा आता परिस्थिती बदलली असली तरी वाडी ,गाव ,समाजा ,संस्था, संघटनेतही व्यक्ति महत्व दिलं जात. अगदी अकारण त्याला सलाम नाही केला तर आपण अडचणीत येऊ अशीच काहींना भीती असते, वरिष्ठाना खुश करण्यासाठी त्यांच्या मागेपुढे धावणारे, बाकिंच्या सहकारी यांच्या बद्द्ल खोटंनाट सांगून आपला कामचुकारपणा झाकून ठेवणारे समाजात कमी नाहीत .यात सरळमार्गाने वागणारा ,जगणारा अडचणीत येतो. त्याला असे लबाड मदत करत नाहीत. ग्रुपबाजी,दडपशाही राबवून काहीजण आपले मोठेपण, आणि महत्व वाढवतात. याला कोणतेही क्षेत्र वर्ज्य नाही .एखादा न्यायनिवाडा करतांना कोण किती तोलमोलाचा आहे यावर न्याय देण्याची पद्धत आहे. यात खरंच जो गरीब आहे त्याच्या सोबत वा त्याच्या बाजूनं बोलणारा कुणी नसेल तर त्यांच्यावर अन्याय झाल्याची कैक उदाहरणे पाहतो तेंव्हा अंतर्मुख होतो .गरीब म्हणजे पैसा ,जमीन,नोकरी नाही ही संकल्पना नसून हे सर्व असतानाही जो प्रामाणिकपणे तटस्थ वागतो ,एखादं ध्येयाने प्रेरित होऊन काम करतो ,यशस्वीतेकडे वाटचाल असते,ज्याचा कुणालाही त्रास नसतो त्यालाच त्रास देणारे काही अल्पसंतुष्ट असतात. आपल्या पेक्षा दुसरा कुणी वरचढ होणार नाहीच याची पुरेपूर दक्षता घेतात .हे पिढ्यांनपिढ्या चालत आलंय लोक अशिक्षित होते तेंव्हा आणि सुशिक्षित झालेत तेव्हाही सुरु आहे .काही लोक पात्रता नसतांना कुणाला तरी तो कुणाच्यातरी जवळचा आहे ,त्यामुळं याच्या मार्फत त्याच्याकडून कामे करून वा आपला स्वार्थ साधून घेता येईल म्हणून त्याला मोठा करतात ,मानतात .त्यासाठी सर्व तंत्राचा वापर करतात .त्यांचे हात दूरवर पसरलेले ,पोहचलेले असतात त्यामुळं त्यांच मोठेपण अबाधित राहत .ज्यांची शक्ति युक्ती कमी ,स्वाभिमानी जगतो तो मागेच राहतो .जो यशस्वी होतो त्यानं जमा केलेले चाहते त्याचे वैचारिक गुलाम बनतात ,हे कटू पण वास्तव चित्रं आहे .मोठ्याच मोठेपण मलाही आवडते .अपेक्षा एवढीच त्यान ते सच्चाईन मिळवून टिकवावे तरच त्याच्या मोठेपणाला अर्थ आहे ,ते कायमच टिकेल बरोबर ना ?

## कथा

सुखदा सयाजीराव गोरड,
दापोली

# बेगमी

"अग सखू उरक बिगी बिगी, अजून किती वणवण फिरणारं हायस सरपणासाठी? सूर्य पार माथ्यावर आला नव्ह ,चल पोटात नुस्ती आग पडलीया बघ!"गंगू म्हणाली आणि दोघीसुदधा लाकडाच्या मोळया डोक्यावर घेऊन निघाल्या वायू वेगाने. मालूने भाजी भाकरी करुन ठेवलीच होती,तिचा गुरुजींनी दिलेला अभ्यासही पूर्ण झाला होता.खूपच भूक लागल्यामुळे ती अगदी मेटाकुटीला येऊन तिच्या आईची वाट बघत होती.परशापण आतुरतेने आईची वाट बघत होता.सखू नि गंगाने वाटेतच फाट्या गोळा करतांना काजू बिया,करवंद, तोरणं,अळू मिळेल ते सर्व काही पिलासाठी गोळा केले होते.झाले......मजल दरमजल करत दोघीही स्वगृही पोहोचल्या.मालुच्या जोरदार "आय"या हाकेने गाढ झोपलेला परशाही खडबडून जागा झाला होता......नि म्हणत होता...."आई आली आई आली."

आईच्या डोक्यावरची मोळी उतरवायला मालू पुढे सरसावली, तिने ती उतरवून आईला डेऱ्यातल थंडगार पाणी सुद्धा प्यायला दिलं नि आईच्या घामेजल्या तोंडावरुन मायेने हात फिरवून ती म्हणाली,"आय चल लवकर हातपाय धुवून घे." लगेचच तिने जेवणाला बसण्याची तयारी करून पानसुदधा वाढली पटापट! सखूने अगदी कृतार्थ नजरेने मालूकडे पाहिले,परशाला पण गोड गोड पापा दिला नि माऊली तिच्या पिल्लांमध्ये पूर्णपणे रममाण झाली. भोजन,केरवारा आटोपून दोघी पण एक मेकींशी बोलू लागल्या. प्रामुख्याने महत्त्वाचे म्हणजे....यंदा जून मध्ये परशाला शाळेत दाखल करणे. मग बोलताबोलता सखूचा डोळा लागला.मालूने उठून करवंदे,बिबा माळा, कैरीचे काप (उसरी) सर्वकाही उन्हात ठेवलच होत त्यात आणखी भर पडली.

सदुसुदधा मधाची पोळी,चिकट डिंक,आंबे,, फाट्या घेऊन जेमतेम घरी पोहोचला. मालूने त्यालाही सर्वकाही यथासांग देऊन भोजनासाठी बसविले. मुलांकडे एक प्रेमळ कटाक्ष टाकल्यामुळे त्याचा श्रमपरिहारच झाला होता! त्याच्या आगमनाच्या चाहुलीने सखूही उठून बसली.....नि सुखी परिवार गप्पा टप्पा मध्ये रममाण झाला. वामकुक्षी झाल्यावर परत आई-वडील मुलांचा निरोप घेऊन निघाले जंगलाकडे रानमेवा गोळा करायला. मग मालूनेही परशाला पाटीवर काही मुळाक्षर दिली गिरवायला! तो सुद्धा ताईने सांगितल्या प्रमाणे ती गिरवू, घटवू लागला.

सूर्यास्त झाल्यावर सखू नि सदापण घरी आले....आता येताना मात्र त्यांनी चहापावडर, साखर, तेल, मसाला.....असा काही बाही जिन्नस जरा जास्तच प्रमाणात घाऊक बाजारातून आणला होता. आज बाजाराचा दिवस होता म्हणून बेकरीचे पदार्थही आणले होते. शेवचिवडा नि जिलेबी सुद्धा आणली होती. मग एका दोन मोठ्ठ्या कुलूप असणाऱ्या डब्यांची कुलूपे काढून सर्व जिन्नस अगदी काही मिनिटांतच मायालेकींनी हसत खेळत भरला सुद्धा.!,,,, पुढे चिंता होती ती रेशनिंगला मिळणाऱ्या गहू, तांदळाची. दिवेलागणीच्या आत उन्हाळी सूकवण घरात आणली व नीट झाकून ठेवली.

असा हा नित्यक्रम....नि नित्य करण्यात येणारी बेगमी!.....हो पावसा पाण्या आधी करुन ठेवायची वर्षभराची बेगमी ! जशी सखू नि तिच्या परिवाराची तशीच तुमची आणि आमचीही!





# चिकन अल्फ्रेडो



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

**साहित्य**

- चिकन 2 हाडेविरहित, त्वचाविरहित कोंबडी मांसल तुकडे
- चवीनुसार मीठ आणि मिरपूड
- 1 टेबलस्पून ऑलिव्ह ऑईल
- 1 टीस्पून लसूण पावडर
- 1 टीस्पून इटालियन मसाला

**अल्फ्रेडो सॉससाठी:**

- **२ टेबलस्पून बटर**
- **2 पाकळ्या लसूण, किसलेले**
- **1 1/2 कप हेवी क्रीम**
- **1 कप ताजे किसलेले परमेसन चीज**
- **1/4 टीस्पून मीठ**
- **1/4 टीस्पून काळी मिरी**
- **1/4 टीस्पून जाय**

**पास्तासाठी:**

- **12 औंस फेटुसिन पास्ता**
- **उकळण्यासाठी पाणी**
- **मीठ**

**गार्निश:**

- **ताजी अजमोदा (ओवा), चिरलेली (पर्यायी)**
- **सर्व्ह करण्यासाठी अतिरिक्त परमेसन चीज**

**कृती -**

- चिकनला दोन्ही बाजूंनी मीठ, मिरपूड, लसूण पावडर आणि इटालियन मसाला घालून चिकनच्या स्तनांना सीझन करा.
- ऑलिव्ह ऑइल एका मोठ्या कढईत मध्यम-उच्च आचेवर गरम करा. गरम झाल्यावर त्यात चिकनचे स्तन घाला.
- चिकन प्रत्येक बाजूला सुमारे 6-7 मिनिटे किंवा सोनेरी तपकिरी होईपर्यंत शिजवा. अंतर्गत तापमान 165°F (75°C) पर्यंत पोहोचले पाहिजे.
- कढईतून चिकन काढा आणि बाजूला ठेवा. किंचित थंड झाल्यावर चिकनचे तुकडे करा.
- पृष्ठभागावर किंवा रोलिंग पिनवर अधिक पीठ घाला.
- गुंडाळलेले पीठ काळजीपूर्वक 9-इंच पाई डिशमध्ये स्थानांतरित करा.
- पिठाची दुसरी चकती पहिल्या प्रमाणेच गुंडाळा.
- ते फिलिंगवर ठेवा.
- सुमारे 1-इंच ओव्हरहँग सोडून, कडा पासून कोणतेही जास्तीचे पीठ ट्रिम करा.
- सील करण्यासाठी वरच्या आणि खालच्या क्रस्ट्सच्या कडा एकत्र दाबा, नंतर इच्छेनुसार कुरकुरीत करा.

एका मोठ्या भांड्यात पाणी उकळून घ्या आणि त्यात चिमूटभर मीठ घाला.
फेटुसिन पास्ता घाला आणि पॅकेजच्या सूचनांनुसार अल डेंटेपर्यंत शिजवा.
सुमारे 1/2 कप पास्ता पाणी आरक्षित करा, नंतर पास्ता काढून टाका आणि बाजूला ठेवा.

**अल्फ्रेडो सॉस बनवा:**

चिकनसाठी वापरल्या जाणाऱ्या त्याच स्किलेटमध्ये, मध्यम आचेवर लोणी वितळवा. किसलेला लसूण घाला आणि सुवासिक होईपर्यंत सुमारे 1 मिनिट शिजवा. मलई घाला आणि मंद उकळी आणा. अधूनमधून ढवळत सुमारे 5 मिनिटे शिजू द्या. सॉस गुळगुळीत आणि मलईदार होईपर्यंत हळूहळू परमेसन चीजमध्ये फेटा. मीठ, मिरपूड आणि जायफळ वापरत असल्यास हंगाम. जर सॉस खूप जाड असेल तर इच्छित सुसंगतता येण्यासाठी थोडेसे राखीव पास्ता पाणी घाला. एकत्र करा आणि सर्व्ह करा. ताबडतोब सर्व्ह करा आणि आनंद घ्या!

## समाजभान



श्री धनंजय शेटये.
गोळवण, ता.मालवण
मोबाईल.
९६१९२२२७०९

# संस्कार'च्या 'शिक्षा' आणि विद्यार्थी!!

काल परवाचीच गोष्ट ,शाळेत नववीच्या वार्षिक परीक्षा सुरू होत्या. प्रकाश सर वर्गात सुपरव्हिजन करीत होते. कॉरिडोअर मध्ये विद्यार्थ्यांचा घोळका चालला होता.
"ए पक्या, एक पक्या ...?"
असा सामुदायिक चिडविण्याचा ओरड्याचा आवाज ऐकू आला. मग ही मुलं टिंगलटवाळी का करतात? याचा विचार करू लागलो. प्रकाश सर खूपच भडकले होते. प्रकाश सर गणित विषयासाठी अनुभवी,तज्ञ शिक्षक! शिकविण्याच्या सहज सोप्या पद्धतीचा विशेष हातखंडा असलेले शिक्षक!! थोडासा स्वभाव कडक शिस्तीचा! शिस्त शिकविणारा शिक्षक विद्यार्थ्यांचा नावडता शिक्षक असतो. अर्थात शिक्षकांचा आदर करणं खूप महत्त्वाची गोष्ट आहे. शिक्षकांची अशी टिंगलटवाळी करणा-या विद्यार्थ्यांवर कारवाई केली नाही तर शाळेची शिस्तबद्धता लुप्त पावत जाते. आमच्या शाळेतील शिस्तप्रिय प्राचार्या, पर्यवेक्षिका यांनी तातडीने आपल्या परीने कडक पावले उचलली. लगेचच कारवाईला सुरुवात झाली. पालकांना बोलावून समज देऊन विद्यार्थ्यांकडून अशी चूक पुन्हा होणार नाही याचे हमीपत्र पालक व विद्यार्थी यांच्याकडून लिहून घेतले. मग आणखी कारवाई तरी कोणती करावी? शारिरीक इजा देणारी हिंसात्मक शिक्षाही योग्य नसते. मग पालकांना शाळेत बोलावून घेतले. पण त्यांनेही काही फरक पडेल असे वाटत नाही. कारण पालक शाळेत आल्यावर बोलतात," अलिकडे तो आमचेही काही ऐकत नाही,उलट उत्तर करतो. तुम्हीच सांगा सर काय करु सर? आमचाही नाईलाज झाला आहे"

म्हणजे अशा विद्यार्थ्यांवर संस्कार घडवायचे, शिस्तबद्धता शिकवायचे सर्वच मार्ग संपलेत का? आज शालेय जीवनात ते विद्यार्थी एवढे बिनधास्तपणे वागत आहेत तर भावी जीवनात त्यांचे काय? गुन्हेगारी जगताकडे नकळत ओढले तर जाणार नाहीत ना? अशी नाहक खंत वाटत राहते. पण मग प्रश्न उरतो शिक्षक म्हणून आपण काहीच करु शकत नाही का? अशा विद्यार्थ्यांना नैतिकता शिकवणं एवढं अवघड आहे का? आजच्या शिक्षणपद्धतीत शिक्षकांजवळ प्रचंड आव्हाने आहेत. आज 'पक्या... पक्या' म्हटले उद्या आणखी कोणाला...तर परवा मलाही 'धन्या धन्या...?' म्हणून चिडवतील आणि त्यांची हिंमत वाढत जाईल. मग शिक्षकांनी दात आणि नखे काढलेल्या वाघासारखे बघत बसायचे का? शिक्षक हा समाज परिवर्तन घडवून आणणारा विधायक घटक आहे. मग त्या घटकाला थोडीशी स्वायत्तता असायला नको का?

मग माझ्या मनात विचार आला हे प्रश्न अशा परंपरागत पद्धतीने सोडविण्यापेक्षा थोडं वेगळे आडवळणाच्या मार्गाने सोडवून बघूया. 'चिडविणे' ' 'शिव्याशाप' देणे ह्या गोष्टी एखाद्या व्यक्तीकडून का घडतात?? मुळापर्यंत जाऊन शोधणं गरजेचं वाटलं. एकतर विद्यार्थ्यांच्या मनातली खदखद व्यक्त करणे.राग व्यक्त करुन मन:शांती मिळविणे हाच उद्देश असतो.जेवढा शिक्षक रागावतो तेवढं त्या विद्यार्थ्यांना आत्मिक समाधान वाटत असते.मुळात शिक्षकांचा पारा चढविणे हे एकमेव कारण असावे.त्या विद्यार्थ्यांना त्या गोष्टीत पराकोटीचा आनंद मिळत असतो.

आपण या गोष्टीच्या मुळापर्यंत पोहोचलो तर कदाचित सोल्यूशन मिळू शकेल. आपण क्रियेला प्रतिक्रिया देत राहिलो तर हे चक्र अधिक गंभीर बनत जाणार.समोरच्याला शिव्या दिल्या पण त्यांने त्या घेतल्याच नाहीत तर त्या शिव्या रिव्हर्स होतात हे तंत्र अवलंबले तर उलट नैतिकता आणि सामंजस्य निर्माण होऊ शकते.

आमच्या मालवणीमध्ये आम्ही मालवणी भाषा बोलत असताना शिव्या (गाळी) तर पावलो पावली देत बोलत असतो. शिव्या प्रेमाने देतो. आई सुद्धा तान्ह्या बाळाला भरवत असताना बाळाला प्रेमाने अलगदपणे ,'**डेच्या खा,मेल्या' शिवी देते.
ब-याच दिवसांनी मी में महिन्याच्या सुट्टीत गावी तर जुने बुजूर्ग लोक मला प्रेमाने शिव्या देऊनच हाक मारतील,
" ***या धन्या, होतस खय इतके दिवस?"
आमच्यासाठी त्या शिव्या मध्ये आपुलकी, जिव्हाळा आणि आत्मियता दडलेली असते. पण शिव्यांच्या ओव्या कशा होतात हे मालवणी लोकांनी जगाला दाखवून दिले आहे.त्यामुळे हिंसात्मक इजा न होता जर शिव्याशाप देऊन मन मोकळे होत असेल तर होऊ द्यावे. आपणही आपले मन शांत ठेवावे. मान अपमानाच्या पलिकडे जाऊन जीवनात आनंद शोधणं गरजेचं आहे. आयुष्य मोठं असण्यापेक्षा छोटं आयुष्यही मजेदारपणे जगावं. आपण आनंद घेत असताना जगालाही आनंद देण्याचा प्रयत्न करावा. आपल्यावर व्यंगात्मक टिका टिप्पणी करून जर एखाद्याला परमसुख प्राप्त होत असेल आणि आपले काही नुकसान होत नसेल तर स्वत:वरच्या टिकेला ही आपण स्वीकारायला शिकले पाहिजे. मग आपोआपच समोरच्याचं मतपरिवर्तन झाल्याशिवाय राहणार नाही.






## स्वप्न

स्वप्नांमागे धावत जातो
का स्वप्नांचे अर्थ लावितो
कधी जिंकतो कधी हारतो
स्वप्नांना मग नाव ठेवितो

स्वप्न पहावे मोठे मोठे
जो तो येतो सांगुन जातो
सांगुन जातो डोस पाजितो
स्वप्न भंगता दोष दावितो

कधी वाटते स्वप्न महाली
नको जायला नको जायला
स्वप्न पाहणे केवळ नशिबी
पात्र विषाचे नको प्यायला

संकेतांचे अर्थ जाणती
स्वप्नांच्या ते पुढे धावती
स्वार होउनी स्वप्नांवरती
दौडत दौडत मार्ग चालती

खरे होतसे स्वप्न कुणाचे
भाग्य तयाला अहा! लाभते
कोणी दमतो थकुनी जातो
आयुष्याचे सूत्र बिघडते

**बाबू घाडीगांवकर**



## स्वप्न....

.स्वप्न हदयात विलसछे
चोरपावलांनी हळूच येते
मनाचा कानोसा घेते
आणि जीवनच बनते!!१!
पाहिले मी नि तू होते
किती यश मिळाले ते
खरंच कळले का तुला ते
तुझ्या माझ्या अंतरात होते!!२!!
दिलासे दिलेस तू लाखमोलाचे
ते ठरले स्वल्प नि फुकाचे
साकडै घातले होते मूर्खपणाचे
साध्य नि मानकरी अपयशाचे!!४!!
असे स्वप्न ते दुभंगले
मनही मग ओशाळले
होत्याचे नव्हते झाले
तरीही असह्य दुःख मी पेलविले!!५!!

**सुखदा सयाजीराव गोरड**

## स्वप्न

आयुष्याच्या प्रवासात कधी
स्वप्नांचे किनारे मला दिसलेच नाहीत
वास्तवाच्या वणव्यात कळे कधी उमललेच नाहीत
आयुष्याचा डोलारा चालू होता व्यवस्थित
पण त्यावर कधी आशेचे धागे गुंतलेच नाहीत

जगून झाले जीवन सारे ,
कुणासाठी मन झुरलेच नाही
शब्द होते मुके झाले आणि डोळ्यांना काही दिसलेच नाही

बालपण ,तारुण्य ,जातच होते सुखाने
रेशमी हिरवळीचा थर पण त्यावर काही चढला नाही

आयुष्याच्या सांजवेळी थकले होते डोळे
त्यावर भार स्वप्नांचा आता काही पेलला नाही

ऐकले होते स्वप्न असतात चंद्र ,चांदण्याची
भाकरीचा चंद्र साकारताना तो काही दिसलाच नाही

मस्त आहे आयुष्य आणि मस्त सारे जीवनही
फक्त एकदाच स्वप्नात जगणे आयुष्यात काही जमले नाही

**सौ. स्मिता कशाळीकर,**
**दोडामार्ग**

## स्वप्न

दरीत पडताना वाटले
आता संपलोच मेलो
दुसऱ्या क्षणी जाणवलेई
हिमालयच चढून गेलो

प्रेम केले जिच्यावर
तिने फिरवले पंखावरून
दुसऱ्याच क्षणी दिसली
धिंड माझी गाढवावरून

एका क्षणी लागला
निकाल अनुत्तीर्ण होण्याचा
क्षणी दुसऱ्या पाहतो
सोहळा माझ्या गौरवाचा

वास्तव मानले नित्य
छत्र आईचे हरवल्याचे
क्षणांत काही दिसले
आई घरातच असल्याचे

देहाला पाहिले आरशात
नित्य नटून मुरडलेले
त्यालाही क्षणात पाहिले
दुर्गंधी चिखलाने माखलेले

आस बाळगून निराशलो
देव भेटतील तीर्थांना
स्वप्नि स्वर्गात फिरलो
भेटून आलो अप्सरांना

जागेपणी उठता बसता
धाक सदैव बायकोचा
बायको गुलाम स्वप्नात
क्षणानुभव लाख मोलाचा

नवरसांचे हे अविष्कार
अघोरी कधी चंदेरी
स्वप्न झुलवते हिंदोळा
पायदळी कधी शिखरी

दैनंदिन कृतिंच्या विचारांतही
स्वप्न असते ठरवलेले
तारतम्य दडलेले स्वप्नातही
सापडलेले कधी हरवलेले

अकारण अकल्पित घटनांचा
स्वप्न अघटीत खेळ
सुप्त कुंडलिनी निर्देशित
स्वार्थिक पारमार्थिक मेळ

**उदय दुदवडकर,**
**तळेरे**

## स्वप्न...!

माझ्या बालपणी...
स्वप्न म्हणजे काय ?
हे मला माहीत नव्हतं...!
मी खूप अभ्यास करून,
सातवी सेंटरला,
पहिला आलो,
गुरुजी म्हणाले...!
तुझ्या आई बाबांचं,आज
स्वप्न तू साकार केलंस...!

माझ्या तरुणपणी...
खूप मेहनत करून,
फर्स्ट क्लास मध्ये
एमएससी पास झालो...!
चांगल्या पगाराची
नोकरी लागली,
सुविद्य पत्नी मिळाली,
वडील मला म्हणाले..
माझं स्वप्न, आज
तू साकार केलंस...!

रिटायर्ड झालो...
मुलं कष्टाने शिकली,
मोठ्या पोस्टवर गेली,
लग्न झाली,
सुंदर सुना आल्या,
सुंदर नातवंडही झाली,
फ्लॅट,गाडीही आली
बायको म्हणाली,आज
आपली स्वप्ने साकार झाली..!

आज माझ्या लक्षात
आलं की...!
अविरत कष्ट केले की,
स्वप्न न पाहता ही
ती पुरी होतात...
कारण स्वप्न हे,
शेवटी मृगजळ असतं..
ते फसव असतं...
ते वाळूत बांधलेल्या,
किल्ल्याप्रमाणे असतं...!

म्हणून म्हणतो मित्रांनो... !
तुमचे श्रम,तुमचा घाम
तुमच्या मनगटातली ताकद,
हीच खरी स्वप्नांची,
व्याख्या आहे...!
तुम्ही कष्ट,मेहनत करा,
उगीच स्वप्नरुपी मृगजळाच्या,
पाठी तुम्ही लागू नका...!
उगीच स्वप्नरुपी मृगजळाच्या,
पाठी तुम्ही लागू नका...!!

**प्रा. के.एस.शिरबंदे,**
**दापोली**

# फरक ओळखा





दैनिक
सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

# बालमैफिल

## बालकांसाठी शालेय मुलांनी तयार केलेले वर्तमानपत्र
## "आजचं पत्र- उद्याच्या समृद्धीसाठी!"

*दैनिक सिंधुदुर्ग समाचारने कोकणातील मुलांना या उन्हाळी सुट्टीमध्ये लिहीत होण्यासाठी एक नवीन उपक्रम हाती घेतला आहे . यामध्ये कोकणातील विविध शाळांतील मुलांनी केलेले लिखाण प्रसिद्ध होणार आहे.*
*प्रामुख्याने या "बालमैफिल" च्या पुरवणीची सर्व जबाबदारी दापोली तालुक्यातील चंद्रनगर येथील शाळेच्या विद्यार्थ्यांनी घेतली आहे. यामध्ये मुलांना लिखाण करण्यासाठी मुलांना प्रोत्साहित करण्यापासून ते पुरवणीची सर्व जबाबदारी या शालेय विद्यार्थ्यांनी घेतली आहे. या उपक्रमासाठी मुलांनी दिलेला होकार आणि भरघोस प्रतिसाद अवर्णनीय आहे . या सर्वांना मार्गदर्शन प्रथितयश लेखक आणि शिक्षक बाबू घाडीगावकर सर करत आहेत .*

**बाल अतिथी संपादक- कु. पुर्वा जगदाळे**



**संपादन सहायक- कु. वैष्णवी आंबेलकर**



**सहसंपादक- कु. वेदिका मुलूख**



**मांडणी व सजावट- कु. शमिका मुलूख.**



**इतर सहाय्य- कु. इशांत पागडे**



# विशेष संपादकीय



## पक्ष्यांवर प्रेम हवेच!

कु. पुर्वा सचिन जगदाळे.
विशेष अतिथी संपादक,

बालपणापासूनच आमची काऊ चिऊशी दोस्ती सुरु होते. पुढे शाळा शिकतानाही हे काऊ चिऊ आमची सोबत सोडत नाहीत. त्यांची चित्रे वाचता वाचता आम्ही काऊ चिऊ गिरवू लागतो. दररोज सकाळी हेच आमचे सवंगडी आम्हाला झोपेतून जागे करतात, उठवतात. त्यांचे आवाज, ओरडणे ऐकता ऐकता, ओळखता ओळखता आमचे सामान्यज्ञान वाढत जाते. सकाळचा काऊ चिऊचा चिवचिवाट आमची सकाळ प्रसन्न करतो.


माझे बाबा सांगतात, त्यांच्या बालपणी आपल्या कोकणात पाखरांचा वावर आणि चिवचिवाट फार होता. हर तऱ्हेचे पक्षी, पाखरे तेव्हा आपल्या अवती भवती दिसत होती. बाबा म्हणतात, अगं हे मोबाईल फोन जेव्हापासून आले, तेव्हापासून पाखरांची, पक्ष्यांची संख्या कमी कमी होत गेली. मोबाईल टॉवर्स मधून निघणाऱ्या विषारी लहरी व किरणोत्सर्गाने अनेक पक्ष्यांच्या जाती नष्ट झाल्या. अनेक जाती आज संकटात आहेत.

बाबा सांगतात, पुर्वीचा उन्हाळा आजच्या इतका कडक नव्हता. उन्हाच्या झळा इतक्या मारत नव्हत्या. वाफा मारत नव्हत्या. पण गेल्या काही वर्षांपासून बेसुमार वृक्षतोड झाली. जंगलं नष्ट झाली. नैसर्गिक जंगलांच्या जागी मानवनिर्मित सिमेंटची जंगलं उभी राहिली. पक्ष्यांसाठी ना निवारे उरले, ना झाडे उरली. परिणामी पृथ्वीचे तापमान वाढले. कालच मी वर्तमान पत्रात वाचलं, जगात सर्वात जास्त वाफांच्या झळा आपल्या भारतात सोसाव्या लागत आहेत. कारण इतर देशात पर्यावरण रक्षणासाठीचे नियम अतिशय कडक आहेत. तिकडे अशा बाबतीत कोणी दया माया दाखवीत नाही. आपल्याकडे मात्र सगळा आनंदीआनंद आहे. एवढ्याशा चिरीमिरीच्या बदल्यात सारे नियम शिथिल होतात. कायद्याचा धाक कुणाला नाही. तशी कडक धाक दाखविणारी सरकारंही आपल्याकडे नाहीत. होऊदेत वृक्षतोड, होऊदेत उजाड डोंगर. आपण आपलं स्थान अधिक मजबूत करण्यासाठी लोकांना कोणत्या ना कोणत्या भावनिक विश्वात गुंतवून ठेवायचं. या अशा बेबंदशाहीमुळेच आज भारतात तरी पक्ष्यांच्या अनेक जाती नष्ट होण्याच्या मार्गावर आल्या आहेत.

आजची घरे, आजचे बंगले पाहता असं दिसतं की, आपल्या देशात पशुपक्ष्यांना अजीबात स्थान नाही. त्यांची इथल्या लोकांना, माणसाला गरजही नाही. त्यामुळेच आताच्या उन्हाळ्यात अनेक पक्षी तडफडून तडफडून मरताना दिसतात. माणसाच्या हव्यासापोटी आधीच पाखरांचे नैसर्गिक निवारे नष्ट झाले आहेत. मात्र आज जे काही पक्षी जीवंत आहेत, त्यांच्यासाठीही पुरेसे पाणी इथं शिल्लक नाही. माणसाला पुढे जीवंत राहायचं असेल, या पृथ्वीवर मानवजात शिल्लक ठेवायची असेल तर निसर्गातील पशुपक्ष्यांवर आधी प्रेम करायला हवं असं मला वाटतं. आपण स्वतःसोबत त्यांचीही काळजी घ्यायला हवी.

आम्ही शाळेत दरवर्षी जंगलातील पाखरांसाठी दाणापाण्याची व्यवस्था करतो. शाळेच्या बागेतील झाडाच्या फांद्यांना दाणा पाण्याची भांडी बांधतो. त्यात दररोज पाणी, धान्य ठेवतो. दररोज पाखरं तिथे येतात. पाण्यात मनसोक्त डुंबतात. अंघोळ करतात. आपल्या इवल्याशा हातांच्या प्रयत्नांमुळे पाखरे खूश व सुखीसमाधानी दिसली की आम्हा मुलांना आनंद होतो. मग मोठी माणसं असं का करत नाहीत, त्यांना का असा आनंद होत नाही असा प्रश्न पडतो. आता आम्ही मुला मुलींनी ठरवलंय, मोठेपणी देखील जंगलातील पशुपक्ष्यांची काळजी घ्यायची. त्यांच्या दाणा पाण्याची व्यवस्था करायची. त्यांच्यावर प्रेम करायचं.








# नदीचे स्विमिंग पूल

माझे आजोळ दापोली तालुक्यातील वणंद गावात आहे. हे गाव नदीकिनारी वसले आहे. नदीच्या काठावर लोकांच्या बागा व घरे आहेत. ही नदी वर्षभर वाहत असते. याच नदीवर गावातील लोकांचे जीवन अवलंबून आहे. गावातील लोकांच्या नारळाच्या बागा आहेत. केळीच्याही बागा आहेत. गावातील लोक नदीच्या पाण्याने बागा फुलवतात. माझ्या मामाचीही नारळाची व केळीची मोठी बाग आहे. मी दरवर्षी मे महिन्यात मामाच्या गावाला म्हणजे वणंदला जाते. मामाच्या घरातील सर्वजण प्रेमळ आहेत. गावातील सर्व लोक प्रेमळ आहेत. मी मामीसोबत दररोज नदीवर जाते. मामी नदीकाठीच्या दगडावर बसून कपडे धुते. तोपर्यंत आम्ही मुले मुली नदीच्या पाण्यात मनसोक्त पोहतो. मामाच्या गावातली नदी म्हणजे मोठे स्विमिंग पूलच आहे. पण ते कोणी बांधलेले नाही. देवाने बनविले आहे. नदीत पोहायला खूप मजा येते. उन्हाळ्यात नदीतील पाणी फार खोल नसते. त्यामुळे पोहताना बुडण्याची भीती वाटत नाही. नदीत किती वेळ पोहले तरी मला कंटाळा येत नाही. नदीचे पाणी एकदम स्वच्छ व निर्मळ आहे. त्यामुळेच नदीत आणखी आणखी पोहावेसे वाटते. मला ही नदी फार आवडते. पावसाळ्यात मात्र नदीला भरपूर पूर येतो. पावसाळ्यात नदीकडे पाहिल्यावर मात्र भीती वाटते. उन्हाळ्यात हीच नदी आम्हाला आमची मैत्रीण वाटते. नदीत पोहायला मिळते म्हणून मी दरवर्षी मे महिन्यात मामाकडे जाते. मला नदी फार आवडते.

**कु. दिया अरुण मुलूख**







# मे महिना आणि नदी, नाले

दरवर्षी मे महिन्यात कडक उन्हाळा जाणवतो. दिवसभर रणरणीत उन पडते. दुपारच्या वेळी तर हे उन फारच कडक असतं. डोक्यावर टोपी घातल्याशिवाय घराबाहेर पडू शकत नाही इतकं हे उन कडक असतं. पावसाळ्यात हिरवागार दिसणारा निसर्ग या महिन्यात एकदम रखरखीत दिसतो. झाडांवरची पाने गळून पडलेली असतात.

पशुपक्ष्यांना प्यायला पाणी मिळत नाही. पाण्यासाठी ते नुसते तडफडत असतात. कारण जंगलातील झरे, नाले, नद्या या महिन्यात कोरड्या पडतात. कुठेच पाणी मिळत नाही. कुठे धरण असेल तर तेही आटून जाते. विहीरीतील पाणी तळाशी जाते. नदीपात्रात मासे तडफडत मरताना दिसतात. कधी कधी पशुपक्षीही तडफडून पाण्याअभावी मरतात. पावसाळ्यापर्यंत जीवंत राहण्यासाठी सर्वांना मोठी कसरत करावी लागते.

दिवसेंदिवस उन्हाळा अधिक कडक होत चालला आहे. दरवर्षी तो आणखी वाढल्यासारखा दिसतो. असं वाटतं की आता जग कधीतरी संपणार आहे. या जगात कोणीच जीवंत राहू शकणार नाही. सगळे पाणी पाणी करून मरणार आहेत. कारण दिवसेंदिवस जगातील गोड पाणी कमी कमी होत आहे. या सगळ्याला आपण माणसेच जबाबदार आहोत. पण असे असले तरी मी म्हातारी होईपर्यंत हे जग संपायला नको असं सारखं सारखं वाटत राहतं.



**कु. वैष्णवी आंबेलकर**



## करूया मैत्री पक्ष्यांशी



कु. नीरजा मनोज वेदक

आमच्या शाळेत आम्ही 1 मे ला महाराष्ट्र दिन साजरा केला. परीक्षाचा निकाल जाहीर झाला,आणि आमच्या बाईंनी आम्हाला उन्हाळ्याची सुट्टी जाहीर केली. आम्हाला खूप आनंद झाला.उन्हाळ्याच्या या सुट्टीत कोणी गावाला आजी आजोबांकडे येत ,तर कोणी मुंबई-पुण्याला जातं. मी ही मुंबईला जाऊन आले.रेल्वे व मेट्रोतून फिरले.नेहरू तारांगण पाहिले, पण राणीची बाग मला पाहायला नाही मिळाली,कारण आमचे गावी यायचं तिकीट त्याच दिवसाचे होते.

पक्षी पाहणे माझा आवडीचा छंद. माझ्या घराभोवती थोडी झाडी आहे. तिथे पक्षी येतात.बरेच दिवस माझ्या मनात एक शंका होती ती म्हणजे हे उन्हा तान्हात फिरणारे पक्षी त्यांना तहान नसेल लागत.त्यांना पिण्यासाठी पाणी मिळत असेल का? त्यांना अन्न मिळत असेल का? म्हणून मी आणि माझ्या बाबांनी आमच्या घराच्या पायऱ्याच्या इथे सिमेंटने पक्षांसाठी पाणी ठेवण्याची जागा केली. आणि घरच्या भोवती असणाऱ्या मोकळ्या जागेतील चिकू व पपई च्या झाडा जवळही पाणी ठेवणे साठी छोटसं तळ तयार केलं.आम्ही रोज त्या तळ्यात पाणी ओततो आणि पक्षांना खाणेसाठी भात ठेवतो. त्यामुळे तिथे खूप सारे पक्षी येतात.सात सात च्या गटात राहणारे सातभाई पक्षी तर आनंदाने त्या तळ्यात आंघोळ करतात.पाणी पितात. भारद्वाज,खारुताई,बुलबुल असे पक्षी येतात.त्या पक्षांना पाहून मला खूप आनंद होतो.सकाळी या पक्षांच्या किलबिलाटांनी मला जाग येते.मी खूपवेळ त्यांचा गोड आवाज ऐकत रहाते.

## मे महिना आणि पाणीटंचाई!



**कु. वेदीका सुभाष मुलूख**

मे महिना आला की पाणीटंचाई हा विषय पहिलीच हजेरी लावतो. मे महिन्यात उन्हाळा ऋतू चालू असतो. उन्हाळ्यात भरपूर ऊन असतो. आता तर उष्णतेची लाट येणार आहे असं सारखं पेपरात येतं. भरपूर उष्णता असल्याने नदीतले विहिरीतले पाणी आटून जाते. आणि पाणीटंचाई होते. मे महिन्यात आमच्या गावात प्रत्येक वाडीत सत्यनारायणाची पूजा असते.

तेव्हा सर्व मुंबईकर गावी येतात. एक दिवस खूप मजा मस्ती करतात , आणि दुसऱ्या दिवशी महिला कपडे धुवायला पाणी आणायला नदीवर जातात. मे महिन्यात नदीवर नुसती गर्दी असते. मे महिन्यात खूप गरम होते. आणि नेमकी लाईफ पण सारखी जात असते. उन्हाळ्यात मी एका टायमाला दोन तीन ग्लास पाणी पिते. मला उन्हाळा ऋतू आवडतच नाही. मे महिन्यात पाणीटंचाई हा विषय पहिलाच असतो. कधी बघावं तेव्हा सर्व माणसे डोक्यावर हांडे घेऊन पाण्यावरच जात असतात. शेवटी मे महिना आणि पाणी टंचाई ना!

## मे महिना आणि नदी नाले

**आला आला उन्हाळा,**
**भास्करा तप्त गोळा**
**तहान लागे क्षणोक्षणी ,**
**खाऊ सारे बर्फाचा गोळा!**

उन्हाळा म्हणजे उकाडां, उन्हाळा म्हणजे आग ओकणारा सूर्य. उन्हाळा म्हणजे घामाचा चिकचिकाट. म्हणूनच लोकांना उन्हाळा आवडत नाही. उन्हात जास्त ऊन पडते. म्हणून माणसाचा बर्फाचा गोळा खावासा वाटतो. पण जर बर्फाचा गोळा खाल्ला तर आजारी पडू शकतात.

ऊन जास्त पडते म्हणून. नदी नारळाचे पाणी कमी होते. कधी कधी तर नदीतील पाणी संपते. प्यायला पण पाणी नसते. नदी नाही कोरडे पडतात. जर आपल्याला पाणी नसेल तर झाडांना काय घालणार. पाणी नसल्यामुळे झाडांना पण आपण पाणी घालत नाही. म्हणून झाडं मारतात. उन्हाळ्यात जास्त पडल्यामुळे काही गावातील माणसं पण म्हणतात. उन्हाळ्यामध्ये खूप लोकांचा जीव जातो. उन्हाळ्यात माणसं आजारी पडतात. जर माणसांना व झाडांना उन्हाचा त्रास होत असेल पशुपक्ष्यांना किती त्रास होत असेल. जर त्यांना पाणी नाही मिळाले ते मारू शकतात. उन्हाळा सर्वजण खूप त्रासलेले असतात.


**कु. मनस्वी वसंत आंबेलकर**

## गावाकडच्या नदीतले मासे

गावी गेल्यावर कधी एकदा नदीकडे जातो असं मला होतं. गावची नदी मला खूप आवडते. वळणं वळणं घेत वाहणारी ती नदी लांबून बघताना सुंदर दिसते. या नदीत भरपूर मासे आहेत. गावी गेल्यावर मी, सिद्धुकाका, संत्याकाका, ऋतिककाका दररोज नदीवर जातो. नदीवर जाताना आम्ही गळ घेऊन जातो. सिद्धुकाकाला गळाने मासे पकडता येतात. गळाला पीठाची गोळी लावून तो गळ नदीत खोल पाण्यात टाकतो. थोड्या वेळातच त्याच्या गळाला मासा लागतो. परवा तर त्याच्या गळाला एवढा मोठा ठीगुर मासा लागला. त्याचे बारा ते पंधरा तुकडे पडले. घरातील सर्वांना तो एकच मासा पुरला इतका मोठा होता. कधी कधी त्याच्या गळाला, बेलका, टोळकी, काढय, वाळयची पात, शिंगटी, खवळे यांसारखे मासेही लागतात. मला सर्वात ठिगुर मासा खायला आवडतो. मासे पकडल्यावर सिद्धुकाका त्याना वेलीत ओवतो आणि सर्वांना दाखवत दाखवत घरी आणतो.

मला मासे खायला जास्त आवडत नाहीत. पण पकडायला मात्र आवडतात. गावी गेल्यावर माझा बराचसा वेळ नदीवर मासे पकडण्यातच जातो. गावच्या नदीतील मासे चवीला रुचकर आहेत. पावसाळ्यात खूप लोक नदीचे मासे पकडतात. पावसाळ्यात तिकडे जाणे मला शक्य होत नाही. म्हणून मी मे महिन्यात सुट्टीत गावी जाऊन नदीतील मासे पकडण्याचा मनसोक्त आनंद घेतो.

**कु. सोहम घाडीगांवकर**



## भयंकर पाऊस

परवाची गोष्ट. दुपारी अडीच वाजताचा पेपर होता. दररोज तो अडीच वाजताच असतो. आम्ही दोन वाजता घरातून बाहेर पडतो. पण त्या दिवशी दुपारचा एक वाजला आणि अचानक ध्यानी मनी नसताना जोराचा वारा सुटला. पालापाचोळा, धूळ गरगर फिरत आसमंतात उडू लागली. मी खिडकीतून बाहेर पाहीलं तर बाहेर सगळीकडे धुळीचे लोळ दिसत होते. एकतर गर्मीने उच्छाद मांडला होता. अंगाची काहिली होत होती. अचानक ढगांचा गडगडाट सुरु झाला. समोर पाहिले तर धुळीच्या लोळांतुनही वीज लखलखताना दिसत होती. पुढच्या क्षणाला जोराचा पाऊस सुरु झाला.

धूळ घरात शिरेल म्हणून मी खिडकीच्या काचा लावून घेतल्या. खिडक्यांवर तडतड धारा आपटू लागल्या. त्या तडतड आवाजात, वाऱ्याच्या घोंगावण्यात इतर काहीच ऐकू येत नव्हते की समोरचे काही स्पष्ट दिसत नव्हते. काही वेळाने वाऱ्याचा जोर कमी झाला. समोर, बाहेर स्पष्ट दिसू लागले. अचानक ठो ठो आवाज करीत ढगात फार मोठा गडगडाट झाला. कुठेतरी वीज नक्कीच पडली असावी. खिडकीच्या काचांवर तडतडाट सुरुच होता. मी बारीक नजरेने बाहेर पाहिलं. तर बाहेर चक्क गारांचा पाऊस पडत होता. बर्फाचे छोटे मोठे खडे सगळीकडे तडतड आवाज करीत आपटत धोपटत पडत होते. मी आईला फोन करून गारांच्या पावसाचे व्हिडीओ पाठवले. आई म्हणाली, बाहेर जाऊन एका ताटलीत गारा वेच आणि घेऊन ये. नाहीतर खिडकी उघडून ताटली हातात धर. गारा ताटलीत पडतील. पण घोंगावणारा आवाज, भयंकर गडगडाट आणि तितकाच भयंकर पाऊस, अशा भयंकर वातावरणात घराबाहेर पडून अंगणात जाऊन गारा वेचण्याची रिस्क कोण घेईल?

**कु. स्नेहा घाडीगांवकर**



## सुट्टी

उन्हाळ्याच्या सुट्टीत मध्ये
येती सारे गावी
धमाल मस्ती करायला

आंबे, फणस, काजू खायला
येती सारे गावी
माझे गाव म्हणजे रानमेव्याची खाण

सगळी कडे आंबा फणसाची झाडे
उन्हाळ्याच्या सुट्टीत मध्ये येते खूप मज्जा
नाही अभ्यासाच टेंशन फक्त खा आंबा
फणस

गावी येते खूप मज्जा
रोज रोज मिलत खायला रानमेवा
जंगलात फिरायला येते खूप मज्जा

करवंद, आंबे, फणस, जांभळे
सगळं मिळत फक्त गावात
म्हणून म्हणतो माझ गाव जगात भारी!



**कु. इशांत राजेंद्र पागडे**

# आणि... गावकोंडीच्या नदीने घेतला मोकळा श्वास!

मालवण तालुक्यातील त्रिंबक हे छोटे, टुमदार गाव. गावाच्या तीन बाजूंस हिरवेगार डोंगर. मात्र गावकोंडीची नदी गावाच्या अगदी मध्यातून बारमाही वाहते. पुर्वी याच नदीच्या पाण्यावर दोन्ही काठांवर उन्हाळ्यात हिरवेगार मळे फुलत. भुईमूग, चवळी, कुळीथ, मिरची, वांगी, वायंगणी भात, मोहरीसारखी पिके घेणारे अनेक शेतकरी या गावात होते. मात्र गेल्या काही वर्षांपासून गावातील लोकांनी शेती कमी केली आहे. त्यामुळेच लोकांचे नदीकडे जाणे-येणे, नदीवरील वावरही कमी झाला आहे. आता सगळ्या सुखसोई घरातच उपलब्ध असल्याने नदीकडे कोणी फिरकत नाही. याचाच परिणाम म्हणून नदीला आता पुर्वीचे सौंदर्य राहिलेले नाही. नदीच्या दोन्ही काठांवरची झुडुपे आता वाढत वाढत नदीपात्रात पोचली आहेत. अनेक ठिकाणी तर या झुडुपांनी नदीलाच गिळंकृत करून टाकले आहे. मातीचे, वाळुचे ढीग ठिकठिकाणी निर्माण झाल्याने नाइलाजाने नदीला तिचे पात्रही बदलावे लागले आहे. आता पावसाळ्यात पुराचे पाणी नदीपात्रातून न वाहता ते काठांवरच्या भात शेतीत घुसते. त्यामुळे दरवर्षी भातशेतीचे अतोनात नुकसान होते. उन्हाळ्यात ठिकठिकाणी नदी अंतर्धान पावली असल्याने ती आता बारमाही वाहताना दिसत नाही.

मात्र पर्यावरणाविषयी संवेदनशील असलेल्या गावातील काही बुजुर्ग व तरुणांनी एकजुटीने आता या नदीपात्राची साफसफाई सुरु केली आहे. पिकाव, फावडी, कोयती, घमेली घेऊन सारे गावकरी नदीला पुनरुज्जीवित करण्यासाठी पुढे सरसावले आहेत. गावातील सर्व घरांतून या सफाई अभियानास फार मोठा प्रतिसाद लाभत आहे. गावातील अनेकांनी स्वेच्छेने आर्थिक मदतही केली असून सफाईच्या कामासाठी पोकलेनचाही वापर करत आहेत. गेल्या पंधरा दिवसांपासून ही स्वच्छता मोहीम सुरु असून आता गावकोंडीच्या नदीने मोकळा श्वास घेण्यास सुरुवात केली आहे. त्रिंबक गावातील सुजाण नागरिकांच्या पर्यावरण विषयक जाणीवेने पंचक्रोशीतील अनेकांनी स्वागत केले असून आवश्यक मदत करण्याचीही तयारी दर्शविली आहे. नुकतीच मालवण पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांनी या नदी स्वच्छता मोहीमेस भेट देऊन येथील कामाचे व त्रिंबकवासियांचे कौतुक व अभिनंदन केले आहे. मृत्युशय्येवर पडलेल्या नदीला सामुहिक श्रमदानातून पुनरुज्जीवित करून मोकळा श्वास घ्यायला लावल्याबद्दल अनेकांनी त्रिंबक वासियांचे कौतुक केले आहे.






# कलांगण




कु. शमिका नयनेश मुलूख




कु. पुर्वा सचिन जगदाळे




कविषा सातारकर
Std 6th
गोवा



- कु. वेदिका सुभाष मुलूख



कु. नीरजा मनोज वेदक



कु.पूर्वा सचिन जगदाळे.

# कोंगळे शाळेचा अमृतमहोत्सव साजरा

दा**पोली-** दापोली तालुक्यातील जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक मराठी शाळा कोंगळे या शाळेने नुकतीच पंच्याहत्तर वर्षे पूर्ण केली. शालेय व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ व मुंबई मंडळ तसेच माजी विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून नुकताच विविध उपक्रमांचे आयोजन करून कोंगळे शाळेत अमृतमहोत्सव साजरा करण्यात आला.

अमृतमहोत्सवाच्या कार्यक्रमानिमित्त कोंगळे शाळेत विविध स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले होते. अमृतमहोत्सवाच्या मुख्य कार्यक्रमात शाळेतील शिक्षक, माजी शिक्षक, माजी विद्यार्थी आदींचा समारंभपूर्वक सत्कार करण्यात आला. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश साळवी, मुंबई मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत बाईत, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष महेश साळवी, शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र पाडवी, शाळेतील शिक्षक हनुमंत गरंडे, प्रियांका वसावे, आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात कोंगळे शाळेत सेवा बजावलेल्या व सध्या इतर शाळेत कार्यरत असलेल्या अनिल आंजर्लेकर, घाणेकर, वारे, बाबू घाडीगांवकर, महेश गिम्हवणेकर, सुनील गुरव यांचा सन्मान करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद साळवी, नामदेव साळवी, राकेश साळवी, अविनाश मोहित, कुणाल मोहित, यांनी केले तर हनुमंत गरंडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

